निपक्ष व निर्भिड वृत्तपत्र

# आत्ताच एक्सप्रेस

✽ मुख्य संपादक ✽
सुग्रीव सोपानराव मुंडे
✽ आवृत्ती संपादक ✽
लक्ष्मीकांत नामदेवराव मुंडे

✽ नांदेड ✽ परभणी ✽ हिंगोली

E-Paper :
www. attachexpress.in
Post Regd.No.
LII/PBN/RNP-183/20021-22

✽ वर्ष १० वे ✽ अंक २७३ ✽ किंमत - २ रु | RNI.No. MAH/MAR2014/56289 | ✽ बुधवार दि.०४ फेब्रुवारी २०२६ | ✽ पाने-४

## लोकसभेत आठ खासदारांचं निलंबन; अध्यक्षांच्या दिशेने कागदपत्रे भिरकावल्याचा आरोप



**आत्ताच एक्सप्रेस**

**नवी दिल्ली –** राहुल गांधी यांनी लोकसभेत माजी लष्करप्रमुख मनोज नरवणे यांच्या अप्रकाशित पुस्तकातील उल्लेखावरून सत्ताधाऱ्यांना घाम फोडलेला असताना आज अमेरिकेबरोबर भारताने व्यापार करार केल्यावरून राहुल गांधींनी आवाज उठवला. या प्रश्नी राहुल गांधींचं समर्थन करणाऱ्या खासदारांनाच निलंबित करण्यात आलं आहे. लोकसभेने आज विरोधी पक्षातील आठ खासदारांना निलंबित केलं आहे. या खासदारांनी लोकसभेत कागदपत्रे भिरकावली असल्याचा आरोप करण्यात आला आहे. दरम्यान, आज दिवसभरासाठी कामकाज तहकूब करण्यात आलं आहे. तसंच, निलंबित करण्यात आलेल्या आठ खासदारांमध्ये महाराष्ट्रातील एका खासदाराचाही समावेश आहे.

निलंबित केलेल्या ८ सदस्यांमध्ये गुरजीत औजला, हिबी एडन, माणिकम टागोर, प्रशांत यादराव पडोळे, किरण कुमार रेड्डी, डीन कुरियाकोसे, अमरिंदर सिंग राजा वारिंग आणि एस. वेंकटेशन यांचा समावेश आहे. लोकसभेतील पीठासीन अधिकारी दिलीप सैकिया यांच्यावर कागदपत्रे फेकून मारल्याने या घटनेचा विरोध केला. संसदीय शिष्टाचाराचा भंग असल्याचं म्हणत अर्थसंकल्पीय अधिवेशनात अशा कृती सहन केल्या जाणार नाहीत, असंही त्यांनी म्हटलंय. त्यामुळे आठ खासदारांना उर्वरित अर्थसंकल्पाकरता निलंबित करण्यात आलं आहे.

दिवसभरासाठी कामकाज तहकूब केल्यानंतर राहुल गांधींनी संसदेच्या बाहेर माध्यमांशी बोलत असताना पंतप्रधान मोदींवर टीका केली. राहुल गांधी म्हणाले, "मला सभागृहात बोलू दिले जात नाही. पंतप्रधान मोदी घाबरलेले आहेत. जो व्यापार करार चार महिन्यांपासून रखडला होता, त्यात काहीच बदल न करता स्वाक्षरी केली गेली आहे. जे मला माहीत आहे, ते पंतप्रधान मोदींनाही माहीत आहे. पंतप्रधानांनी काल सायंकाळी करारावर स्वाक्षरी केली. त्यांच्यावर खूप दबाव आहे."

"पंतप्रधान मोदींची प्रतिमा निर्माण करण्यासाठी हजारो कोटी रुपये खर्च करण्यात आले होते. पण त्या प्रतिमेचा फुगा फुटू शकतो, अशी त्यांना भीती वाटते. मुख्य म्हणजे, आपल्या पंतप्रधानांना तडजोड करण्यासाठी भाग पाडले गेले. हे कुणी केले, कसे केले, याचा विचार भारताच्या जनतेने करावा. पण इतिहासात पहिल्यांदा विरोधी पक्षनेत्याला राष्ट्रपतींच्या अभिभाषणावर बोलू दिलेले नाही", असा आरोप राहुल गांधी यांनी केला.

लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी पुढे म्हणाले, "भारतातील शेतकऱ्यांच्या घामाला पंतप्रधान मोदींनी विकले आहे. त्यांनी फक्त शेतकरी आणि सामान्य लोकांना नाही तर देशालाही विकले आहे. यासाठीच मला सभागृहात बोलू दिले जात नाही. पंतप्रधान मोदी घाबरलेले आहेत. कारण ज्या लोकांनी त्यांची प्रतिमा तयार केली होती, ती भंग पावली आहे."

"पंतप्रधान मोदींवर कोणता दबाव आहे? असा प्रश्न माध्यमांनी विचारला असता राहुल गांधी यांनी याचे उत्तर दिले. ते म्हणाले, गौतम अदाणी यांच्यावर अमेरिकेत खटला दाखल आहे. हा खटला अदाणींना लक्ष्य करत नाही. तर तो पंतप्रधान मोदींच्या आर्थिक ढाच्याला लक्ष्य करत आहे. दुसरा विषय एपस्टीन फाईल्सचा आहे. त्यात अजून बऱ्याच गोष्टी आहेत. बराच भाग अजून प्रसिद्ध झालेला नाही. अदाणींवर असलेला खटला हा मोदींवरचा खटला आहे", असाही आरोप राहुल गांधी यांनी केला.

"संसदेत का बोलू दिलं जात नाही, यावर विरोधी पक्षनेने राहुल गांधी यांनी स्पष्ट भूमिका मांडली आहे. पंतप्रधानांनी अमेरिकेसमोर ज्या प्रकारची शरणागती पत्करली आहे, व्यापार करार कसा झाला आणि व्यापार करारात घडलेल्या संशयास्पद गोष्टींमुळे हे घडले आहे. एपस्टाईन ही अशी गोष्ट आहे ज्यावर संसदेत चर्चा व्हायला हवी, परंतु या सर्व गोष्टींवर चर्चा झालेली नाही. आम्ही सभागृहाच्या आत आणि बाहेर आमचा निषेध सुरू ठेवू. आमचे आठ खासदार निलंबित आहेत, परंतु आम्ही संसदेच्या आत आणि बाहेर आमचा लढा सुरू ठेवू", असं निलंबित करण्यात आल्यानंतर खासदार हिबी एडन म्हणाले.

"जनतेच्या हक्कासाठी जे लढतात त्यांना गायब केलं जातं किंवा निलंबित केलं जातं. जनतेच्या प्रश्नावर सरकार बोलत नाही. राहुल गांधींनी विचारलं आहे की इतर देश काही करत असेल तर आपण काय केलं पाहिजे. पण त्यांचा आवाज दडपवण्याचा प्रयत्न करण्यात आला. त्यामुळे त्यांच्या समर्थनार्थ उभे राहू. जनतेच्या हितासाठी मी फाशीवरही जायला तयार आहे", असं खासदार प्रशांत पाडोळे म्हणाले. लोकसभेतील ८ खासदारांच्या निलंबनाविरोधात आणि भारत-अमेरिका व्यापार कराराच्या विरोधात लोकसभा खासदार राहुल गांधी, प्रियंका गांधी वड्रा आणि इतर खासदारांसह काँग्रेस खासदारांनी संसदेच्या मकर द्वार येथे निदर्शने केली.

काँग्रेस खासदार प्रियंका गांधी वड्रा यांनी लोकसभेतून पक्षाच्या आठ खासदारांच्या निलंबनावर टीका केली. त्या म्हणाल्या, "हे हास्यास्पद आहे. लोकशाहीत प्रत्येक सदस्याला बोलण्याचा अधिकार असला पाहिजे आणि त्यांचे प्रश्न ऐकले पाहिजेत."

## वनविभाग की भ्रष्टाचाराचे जंगल? किनवट वनपरिक्षेत्रात कोट्यवधींच्या कथित लुटीचा स्फोट, सतीश बोंतावार यांचा थेट हल्लाबोल

**आत्ताच एक्सप्रेस**

**किनवट –** पर्यावरण रक्षण, वनसंवर्धन आणि जनहितासाठी असलेला वनविभागच जर भ्रष्टाचाराच्या दलदलीत अडकला असेल, तर जनतेने विश्वास ठेवायचा तरी कुणावर? हाच संतप्त आणि जळजळीत प्रश्न उपस्थित करत प्रहार जनशक्ती पक्षाचे विधानसभा प्रमुख सतीश बोंतावार (किनवट/माहूर) यांनी किनवट वनपरिक्षेत्रातील कथित भ्रष्टाचाराचा मोठा पर्दाफाश केला आहे. सन २०२२ ते २०२५ या कालावधीत किनवट वनपरिक्षेत्रात करण्यात आलेल्या विविध विकासकामांमध्ये प्रचंड अनियमितता, नियमबाह्य खर्च, कागदोपत्री कामे आणि प्रत्यक्षात जंगलात कामांचा ठावठिकाणा नसल्याचे गंभीर आरोप त्यांनी संबंधित वरिष्ठांकडे केलेल्या लेखी तक्रारीतून उघडकीस आणले आहेत.

तक्रारीनुसार वनपरिक्षेत्रातील नालेबंधारे, पाणलोट क्षेत्र विकासाची कामे, वृक्षलागवड, रोपवाटिका, ट्रेंचिंग, गॅबियन, पाणी साठवण, सीसीटी, सिटीटी, टीएसएम, एनएआर, रोपसंवर्धन, रस्ते व इतर अनुषंगिक कामे कागदोपत्री पूर्ण दाखवण्यात आली आहेत. मात्र प्रत्यक्ष पाहणी केली असता अनेक ठिकाणी ही कामे अर्धवट, निकृष्ट दर्जाची किंवा अस्तित्वातच नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. जंगलात कामे न करता कागदावर सर्व काही "पूर्ण" दाखवून सरकारी निधीची उचल झाल्याचा संशय तक्रारीतून व्यक्त करण्यात आला आहे.

या संपूर्ण प्रकरणात डीपीआर, मोजमाप पुस्तिका (एमबी), कामांचे नकाशे, लांबी-रुंदी-खोली, पाणलोट क्षेत्राची मोजणी, तांत्रिक मंजुरी (टेक्निकल सँक्शन) आणि अंतिम मंजुरी या सर्व बाबी संशयाच्या भोवऱ्यात सापडल्या आहेत. अनेक कामांना आवश्यक तांत्रिक मान्यता नसतानाच देयके अदा करण्यात आली, काही ठिकाणी मोजमाप न करता बिले काढण्यात आली, तर काही कामे प्रत्यक्षात न करता अहवालांमध्ये पूर्ण दाखवण्यात आल्याचा गंभीर आरोप आहे. हा प्रकार केवळ निष्काळजीपणा नसून नियोजनबद्ध आर्थिक अपहार असल्याचे चित्र तक्रारीतून समोर येत आहे.



शासनाचा उद्देश स्थानिक नागरिकांना रोजगार देण्याचा असताना, या कामांमध्ये स्थानिक मजुरांना डावलून बाहेरच्या लोकांना व कंत्राटदारांना प्राधान्य देण्यात आल्याचा आरोपही करण्यात आला आहे. त्यामुळे स्थानिक बेरोजगारांवर अन्याय झाला असून शासनाच्या सामाजिक व आर्थिक धोरणांनाही हरताळ फासण्यात आला आहे. कामांचा दर्जा इतका निकृष्ट असल्याचा आरोप आहे की, काही ठिकाणी पहिल्याच पावसात कामे वाहून गेली किंवा काही महिन्यांतच निष्प्रभ झाली आहेत.

तक्रारीत वनपरिक्षेत्र अधिकारी श्री. प्रमोद राठोड यांच्या भूमिकेवर थेट बोट ठेवण्यात आले असून त्यांच्या कार्यकाळातील सर्व कामांची निष्पक्ष व सखोल चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे. तसेच नोकरीपूर्व व नोकरीनंतर त्यांच्या संपत्तीत किती वाढ झाली याचीही चौकशी व्हावी, अशी ठाम मागणी सतीश भाऊ बोंतावार यांनी केली आहे. या चौकशीतून अनेक धक्कादायक बाबी समोर येतील, असा दावा तक्रारदारांनी केला आहे.

या कथित गैरप्रकारांबाबत योग्य ती कारवाई न झाल्यास उच्च न्यायालयात धाव घेण्याचा इशारा देण्यात आला असून भारतीय दंड प्रक्रिया संहिता कलम १५६(३) अंतर्गत गुन्हा दाखल करून संपूर्ण प्रकरणाची आर्थिक, प्रशासकीय व फॉरेन्सिक चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे. त्यामुळे आता प्रश्न असा उपस्थित झाला आहे की, किनवट वनपरिक्षेत्रातील हा कथित भ्रष्टाचाराचा मामला वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या आशीर्वादाने तर घडलेला नाही ना? शासन या प्रकरणात ठोस कारवाई करणार की पुन्हा एकदा सत्य दडपले जाणार, याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

## राज्यातील गरीब शेतकऱ्यांची कर्जमाफी होणार, चंद्रशेखर बावनकुळे यांची घोषणा

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई -** गरीब शेतकऱ्यांची सरकारकडून कर्जमाफी केली जाणार आहे. शेतकरी कर्जमाफीचा दिलेला शब्द सरकार नक्की पाळेल, असा ठाम विश्वास महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी व्यक्त केला आहे. फार्महाऊसधारक किंवा धनदांडग्या शेतकऱ्यांचा विचार न करता, वर्षानुवर्षे शेतात राबणाऱ्या गरीब शेतकऱ्यांसाठीच कर्जमाफीचा निर्णय घेतला जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले. कर्जावर व्याज आणि व्याजावर व्याज वाढत असल्यामुळे शेतकरी आत्महत्येचा विचार करतो, मात्र अशा परिस्थितीत शेतकऱ्यांना एकटे सोडणार नाही. गरीब शेतकऱ्यांची कर्जमाफी सरकार करणार असल्याचं बावनकुळे यांनी सांगितले. धाराशिव जिल्ह्यातील येणेगुर येथे झालेल्या सभेत त्यांनी हे वक्तव्य केलं असू, पुढील काळात शेतकऱ्यांना कर्ज घ्यावं लागू नये, असा विचारही सरकार करत असल्याचं त्यांनी म्हटले आहे.

गरीब शेतकरी ४० – ४० वर्षे शेतात राबतात. कर्जबाजारी होऊन आत्महत्येचा विचार करतात. या शेतकऱ्यांना आम्ही आत्महत्या करू देणार नाही, असे चंद्रशेखर बावनकुळे यांनी म्हटले. चंद्रशेखर बावनकुळे यांच्या या वक्तव्यामुळे महायुती सरकारकडून लवकरच शेतकऱ्यांच्या कर्जमाफीबाबत मोठा निर्णय होण्याची शक्यता आहे. त्यामुळे आता राज्य सरकार कर्जमाफीच्या निर्णयाची घोषणा कधी करणार, याकडे सर्वांच्या नजरा लागल्या आहेत. मात्र, बावनकुळे यांनी फक्त गरीब शेतकऱ्यांनाच कर्जमाफी मिळेल, असे म्हटले आहे. त्यामुळे गरीब शेतकऱ्यांच्या निकषात नेमके कोणते शेतकरी बसणार आणि कोणत्या शेतकऱ्यांना वगळले जाणार, शेतकऱ्यांची गरिबी ठरवण्याचा मापदंड काय असणार, हे प्रश्न अद्याप अनुत्तरित आहेत.

काँग्रेसचे सरकार असलेल्या राज्यांमध्ये लाडकी बहीण योजना बंद करण्यात आली असल्याचा आरोप महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केला आहे. देशातील भाजपशासित राज्यांमध्ये मात्र ही योजना सुरू असून, महाराष्ट्रातही नरेंद्र मोदी आणि देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली लाडकी बहीण योजना सुरूच राहील, असं त्यांनी स्पष्ट केलं आहे. यासोबतच केंद्र सरकारने एक कोटी लखपती दीदी योजना सुरू केल्याचं सांगत, आता राज्यातील महिलांना विनातारण, विनाहमी पाच लाख रुपयांचं बिनव्याजी कर्ज मिळणार असल्याची माहिती बावनकुळे यांनी दिली आहे. धाराशिव जिल्ह्यातील येणेगुर येथील जिल्हा परिषदेच्या निवडणुकीच्या प्रचाराच्या अनुषंगाने आयोजित सभेत बावनकुळे बोलत होते.

## स्मार्ट प्रीपेड मीटर सक्तीबाबत देशभरातील वीज कर्मचारी १२ फेब्रुवारीला संपावर

**आत्ताच एक्सप्रेस**

**नागपूर -** वीज क्षेत्रातील खासगीकरण, बहुल परवाना व्यवस्था, सक्तीची स्मार्ट मीटर योजना आणि सार्वजनिक वीज व्यवस्थेवर होणाऱ्या हल्ल्याविरोधात देशभरातील वीज कर्मचारी व अभियंते १२ फेब्रुवारी २०२६ रोजी देशव्यापी संप व कामबंद आंदोलनावर जाणार असल्याचा इशारा अखिल भारतीय वीज कर्मचारी महासंघाने दिला आहे. केंद्र सरकारच्या वीजविषयक धोरणांमुळे सार्वजनिक वीज क्षेत्र, ग्राहकांचे हित, शेतकरी आणि देशाची ऊर्जा सुरक्षितता धोक्यात येत असल्याचा आरोप महासंघाने केला आहे. आंदोलन चिरघडल्यास वीज यंत्रणा विस्कळीत होण्याचा धोका आहे.

महासंघाने केंद्रीय ऊर्जामंत्र्यांना पाठविलेल्या अधिकृत नोटिसीनुसार, देशातील सर्व राज्यांतील वीज मंडळे, वितरण कंपन्या आणि वीज क्षेत्रातील लाखो कर्मचारी या आंदोलनात सहभागी होणार आहेत. वीज क्षेत्र हे राष्ट्रीय पायाभूत सुविधांचा कणा असून उद्योग, शेती, ग्रामीण उपजीविका आणि सामाजिक-आर्थिक प्रगतीसाठी ते अत्यंत महत्त्वाचे आहे.

मात्र केंद्र सरकारचा प्रस्तावित वीज दुरुस्ती कायदा २०२५, राष्ट्रीय वीज धोरण २०२६ तसेच केंद्र व राज्य सरकारांची आक्रमक खासगीकरणाची भूमिका या क्षेत्राची मुळापासून मोडतोड करत असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

महासंघानुसार, वीज वितरणात खासगीकरण, सार्वजनिक-खासगी भागीदारीचा आग्रह, बहुल परवाना पद्धत, सक्तीची स्मार्ट मीटर बसवणी, वीज प्रसारणात स्पर्धात्मक बोली पद्धत, तसेच संचालन व देखभाल खासगी कंपन्यांकडे सोपवण्याचे धोरण राबवले जात आहे. यामुळे सार्वजनिक नियंत्रण संपुष्टात येऊन मोजक्या कंपन्यांचा फायदा होणार असून सामान्य ग्राहक, शेतकरी आणि गरीबांवर दरवाढीचा बोजा पडणार आहे. आडवे अनुदान संपुष्टात येऊन वीज दर असह्य होतील, अशी भीती महासंघाने व्यक्त केली आहे. त्यामुळे हे आंदोलन असल्याचा महासंघाचा दावा आहे.

## प्रफुल्ल पटेलांनी घेतली मोदी-शहांची भेट; दोन्ही नेत्यांसोबत बंद दरवाज्याआड चर्चा

**आत्ताच एक्सप्रेस**

**नवी दिल्ली –** सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्याध्यक्ष प्रफुल्ल पटेल यांनी आज नवी दिल्लीत पंतप्रधान नरेंद्र मोदी व केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची भेट घेतली. पटेल यांनी या दोन्ही नेत्यांशी स्वतंत्रपणे बंद दरवाज्याआड चर्चा केली. अजित पवारांच्या अपघाती निधनानंतर राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेतृत्वाचा पेचप्रसंग तथा विलीनीकरणाच्या मुद्यावर उलटसुलट चर्चा सुरू असताना प्रफुल्ल पटेल यांनी मोदी व शहांची भेट घेतली आहे. त्यामुळे या भेटीनंतर राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये वेगाने घडामोडी घडण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे गत बुधवारी विमान अपघातामध्ये निधन झाले. तेव्हापासून त्यांच्यानंतर पक्षाची धुरा कोण सांभाळणार? असा प्रश्न उपस्थित होत आहे. सुनेत्रा पवार यांच्या शपथविधीनंतरही ही चर्चा थांबली नाही. प्रफुल्ल पटेल यांनी आज स्वतः पुढे येऊन आपण अध्यक्षपदाच्या शर्यतीत नसल्याचे स्पष्ट केले. त्यानंतर काही वेळातच त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी व केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची स्वतंत्रपणे भेट घेऊन त्यांच्याशी बंद दरवाज्याआड चर्चा केली. या चर्चेचा तपशील अद्याप बाहेर आला नाही. पण ही चर्चा राष्ट्रवादी काँग्रेसमधील सध्याच्या घटनाक्रमाभोवतीच फिरती होती असे सांगितले जात आहे.

सध्या दिल्लीत संसदेचे अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरू आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी यानिमित्त आज एनडीएच्या सर्व खासदारांची एक बैठक घेतली. त्यांना मार्गदर्शन घेतले. यावेळी मोदींनी अजित पवारांनाही श्रद्धांजली वाहिली. त्यानंतर प्रफुल्ल पटेल यांनी मोदी व अमित शहा यांची भेट घेतली. उल्लेखनीय बाब म्हणजे राष्ट्रवादीच्या दोन्ही गटांच्या विलीनीकरणाला मोदी – शहांनी ग्रीन सिग्नल दिल्याची नवी माहिती पुढे आली आहे. या पार्श्वभूमीवर प्रफुल्ल पटेल यांनी या दोन्ही नेत्यांची भेट घेतली आहे. त्यामुळे साहजिकच त्यांनी या बैठकीत या दोन्ही नेत्यांनी विलीनीकरणाच्या त्यांनी हिरवी झेंडी दिली होती काय? याची खातरजमा केल्याचेही सांगण्यात येत आहे. पण त्याची पुष्टी होऊ शकली नाही. प्रफुल्ल पटेल यांनी मोदी- शहांची भेट घेतल्यानंतर आता उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवारही दिल्ली दौऱ्यावर जाणार असल्याची माहिती आहे. पण त्या केव्हा जाणार? हे अद्याप स्पष्ट झाले नाही. कदाचित ते पुढल्या आठवड्यात दिल्लीत जातील असे सांगितले जात आहे.

## मीरा-भाईंदरमध्ये अमराठी महापौर, डिंपल मेहता पदभार स्वीकारणार, मराठी एकीकरण समिती आक्रमक, वातावरण तापलं

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई –** मीरा-भाईंदर महानगरपालिका निवडणुकांनंतर शहरातील राजकारणाने नवीन आणि वादग्रस्त वळण घेतले असून, "मराठी महापौर" या मुद्द्यावर आता संघर्ष सुरू असल्याचं चित्र आहे. भाजपकडून डिंपल मेहता यांनी महापौरपदासाठी नामनिर्देशन अर्ज दाखल केल्याने, मीरा-भाईंदर महापालिकेला एमएमआरमधील पहिला अमराठी महापौर मिळण्याची शक्यता जवळपास निश्चित मानली जात होती. या घडामोडीमुळे मराठी समाजात तीव्र प्रतिक्रिया उमटत असून, महाराष्ट्र नवनिर्माण सेनेसह मराठी एकीकरण समिती आक्रमक झाल्याचं दिसून आलं, त्यानंतर आता मीरा-भाईंदर महापालिकेमध्ये मराठी महापौरच बसावा या मागणीसाठी मराठी एकीकरण समितीकडून आज पुन्हा एकदा मीरा-भाईंदर महापालिकेच्या बाहेर आंदोलन केले जाणार आहे. मीरा भाईंदर महापालिकेमध्ये आज भाजपचा महापौर हा पदभार स्वीकारणार आहे. भाजपकडून डिंपल मेहता यांनी एकमेव अर्ज भरला असून या मीरा-भाईंदरच्या महापौरपदी आज पदभार स्वीकारतील.

मात्र मागील काही दिवसांपासून मीरा भाईंदरमध्ये मराठीच महापौर व्हावा अशी मागणी मराठी एकीकरण समिती मनसे आणि इतर राजकीय पक्ष आणि संघटनांकडून करण्यात आली आहे. त्यामुळे आज मोठा वाद मीरा-भाईंदर महापालिकेच्या बाहेर होण्याची शक्यता आहे. सुभाष चंद्र बोस मैदान ते मीरा भाईंदर महापालिका असा मोर्चा मराठी एकीकरण समितीकडून सकाळी दहा वाजता काढला जाणार आहे. या मोर्चाला अद्याप परवानगी देण्यात आलेली नसून परवानगीचे पत्र ही पोलिसांना दिलेलं नाही, त्यामुळे पोलिसांकडून आंदोलकांना नोटीस पाठवण्यात आली आहे. शिवाय मराठी एकीकडे समितीचे आंदोलन सुभाष चंद्र बोस मैदानातच करण्यात यावं असं सुद्धा नोटीसमध्ये सांगण्यात आलं आहे.

मराठी एकीकरण समितीचे अध्यक्ष गोवर्धन देशमुख याबाबत म्हणाले, रवींद्र चव्हाण आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना आमची एकच मागणी आहे की, इथे मीरा-भाईंदर महापालिकेत मराठी महापौर करा. एक महिन्यापासून आमची हीच मागणी आहे.

डिंपल मेहता दुसऱ्यांदा महापौर होत आहेत आमचा पहिल्या वेळेस सुद्धा त्यांना विरोध होता. नरेंद्र मेहता आमदार आहेत, दुसरे मोरारजी देसाई इथे तयार होत आहेत आणि घराणेशाही इथे सुद्धा पाहायला मिळते, म्हणूनच डिंपल मेहतांना दुसऱ्यांदा महापौर केलं जात आहे. आम्हाला पोलिसांनी नोटीस दिल्या मात्र आम्ही सुद्धा पोलिसांना सांगतो की, आम्ही मीरा-भाईंदर महापालिकेपर्यंत मोर्चा घेऊन जाणार आहोत. जर एवढा विरोध करून सुद्धा मराठी महापौर बसवला जाणार नसेल आणि डिंपल मेहताच महापौर बसतील तर आमचं आंदोलन अधिक तीव्र होईल. आगरी कोळ्यांचे मीरा-भाईंदर शहर आहे, मराठी माणसांचे शहर आहे, मुख्यमंत्र्यांनी सुद्धा भाषणामध्ये सांगितलं होतं की महापौर मराठीच बसणार असंही ते पुढे म्हणालेत.

भाजपाच्या या निर्णयामुळे मराठी समाजात असंतोषाची तीव्र लाट उसळली आहे. "मराठी माणसाचा वापर केवळ मतांसाठीच केला जातो का?" असा थेट सवाल मराठी एकीकरण समितीने उपस्थित केला आहे. मराठी अस्मितेचा मुद्दा डावलल्याचा आरोप करत, समितीने भाजपाच्या भूमिकेचा तीव्र शब्दांत निषेध नोंदवला आहे. मनसे आणि शिवसेना ठाकरे गटाकडून देखील भाजपच्या भूमिकेचा विरोध केला जात आहे.

## आयपीओचे मृगजळ, गुंतवणूकदारांची लूट!

१६ जानेवारी २०२६ रोजी आपण 'स्टार्टअप इंडिया'ची दहा गौरवशाली वर्षे पूर्ण केली. देशात दोन लाखांहून अधिक स्टार्टअप्स उभे राहिले असून त्यांनी १५ लाख कोटींचे भांडवल सुरक्षित केले आहे. ही आकडेवारी निश्चितच सुखावह वाटते. पण, या नाण्याच्या दुसऱ्या बाजूकडे लक्ष देणे आणि वास्तव समजून घेणेही महत्त्वाचे आहे.

शेअर बाजार म्हणजे केवळ आकड्यांचा खेळ नसून विश्वासाचा व्यापार आहे. पण गेल्या काही वर्षांत भारतीय शेअर बाजाराच्या या पवित्र अंगणात गुंतवणुकीपेक्षा लुटालुटीचा वास जास्त येऊ लागला आहे. एकीकडे टाटा, बिर्ला आणि इन्फोसिससारखे वटवृक्ष आहेत, ज्यांनी शून्यातून विश्व निर्माण करून सामान्य गुंतवणूकदाराला समृद्ध केले; तर दुसरीकडे नव्या दमाच्या अशा कंपन्या आहेत, ज्यांच्या नफ्याचा कुठे पत्ता नाही, पण त्यांचे आयपीओ (नव्या समभागांची विक्री) मात्र हजारो रुपयांच्या जादा दराने बाजारात येत आहेत. ज्याला आपण मुक्त अर्थव्यवस्था म्हणतो, ती खरोखरच प्रगतीसाठी आहे, की सामान्य माणसाच्या खिशावर कायदेशीर दरोडा टाकण्यासाठी? तोट्यात चालणाऱ्या कंपन्यांना अब्जावधींचे मूल्यांकन मिळतेच कसे आणि गुंतवणूकदारांचे रक्षण करणारी 'सेबी' या सर्व खेळात खरोखरच हतबल आहे की केवळ मूक प्रेक्षक? पेटीएमच्या पडझडीपासून अदानींच्या झंझावातापर्यंत आणि टाटा-बिर्लांच्या नैतिकतेपासून मर्चंट बँकर्सच्या चाणाक्ष खेळीपर्यंत... आयपीओच्या या मायाबाजाराचा खरा चेहरा पडताळणे आवश्यक आहे. केवळ आकडेवारीच नाही, तर कष्टाच्या पैशांना मृगजळापासून वाचवण्यासाठी दिलेला हा एक वस्तुनिष्ठ आणि धोक्याचा इशारा आहे. नुकतेच, १६ जानेवारी २०२६ रोजी आपण स्टार्ट अप इंडियाची दहा गौरवशाली वर्षे पूर्ण केली. वर्तमानपत्रांमधील पान-पान भरून आलेल्या जाहिराती सांगत आहेत की, देशात दोन लाखांहून अधिक स्टार्टअप्स उभे राहिले असून त्यांनी १५ लाख कोटींचे भांडवल सुरक्षित केले आहे. ही आकडेवारी निश्चितच सुखावह वाटते. पण, या नाण्याच्या दुसऱ्या बाजूकडे कोणी कॅमेरा वळवला आहे का?

भारतीय शेअर बाजारात सध्या आयपीओंची जणू लाटच आली आहे. गेल्या काही वर्षांमध्ये या माध्यमातून बाजारात पैशांचा महापूर आला आहे. २०२५ हे वर्ष भारतीय प्राथमिक बाजारासाठी एक ऐतिहासिक वर्ष ठरले. या एकाच वर्षात १०३ कंपन्यांनी मुख्य बाजारात तब्बल १.७६ लाख कोटी रुपयांचे विक्रमी भांडवल जमा केले आहे. हा आकडा २०२४ मधील १.६० लाख कोटी रुपयांपेक्षाही मोठा आहे. पण, इतक्या मोठ्या प्रमाणावर पैसा बाजारात येत असताना कोणत्याही यंत्रणेने हे तपासायचा प्रयत्न केला आहे का, की सूचीबद्ध झाल्यानंतर या कंपन्या कुठे उभ्या आहेत? एखादी कंपनी जादा दराच्या नावाखाली सर्वसामान्यांचे खिसे रिकामे करते, तेव्हा तिचे उत्तरदायित्व काय? इथे 'पेटीएम'चा धडा महत्त्वाचा ठरतो. नोव्हेंबर २०२१ मध्ये वन ९७ कम्युनिकेशन्सने देशातील सर्वात मोठी १८,३०० कोटी रुपयांची समभाग विक्री आणली. कंपनीने यासाठी प्रति शेअर २,१५० रुपये इतकी किंमत लावली होती. त्यामध्ये २,१४९ रुपये हा केवळ प्रिमियम होता, पण सूचीबद्द झाल्याच्या काही दिवसांमध्ये काय घडले? हे स्वप्न पत्त्याच्या बंगल्यासारखे कोसळले. २,१५० रुपयांवरून हा शेअर थेट ४०० रुपयांच्या आसपास खाली आला. आज २०२६ मध्ये मागे वळून पाहतो, तेव्हा लक्षात येते की या एका मृगजळामुळे लाखो सामान्य गुंतवणूकदारांचे हजारो कोटी रुपये मातीत मिसळले. पेटीएमच नाही; ही तर एक साखळी आहे. पेटीएमने रस्ता दाखवला आणि त्यानंतर अनेक बड्या नावांनी जादा दराचा हा खेळ खेळला. भारतीय आयुर्विमा महामंडळासारख्या प्रतिष्ठित संस्थेने मे २०२२ मध्ये २१,००० कोटी रुपयांचा आयपीओ आणला. ९४९ रुपये किंमत लावूनही लिस्टिंगनंतर हा शेअर ५३० रुपयांपर्यंत खाली घसरला. आजही हा शेअर आपल्या मूळ किमतीला स्पर्श करण्यासाठी धडपडत आहे. अगदी टाटा टेक्नॉलॉजीसारख्या विश्वासाच्या नावाचा करिश्मा वापरून ५०० रुपयांचा शेअर १,४०० वर नेला गेला आणि आता तो पुन्हा निम्म्यावर आला आहे. हीच स्थिती आयआरसीटीसीची आहे. या कंपनीचा शेअर सहा हजार रुपयांपर्यंत गेला होता, पण आज एक हजार रुपयांच्या पातळीला स्पर्श करण्यासाठी गेल्या दोन वर्षांपासून संघर्ष करत आहे. आयपीओच्या या मायाबाजारात केवळ मोठी नावेच लुटत नाहीत, तर लहान आणि मध्यम आकाराच्या कंपन्यांनीही सामान्य गुंतवणूकदारांच्या कष्टाच्या पैशांची अक्षरशः राख केली आहे. व्हिक्टरी ईव्हीपासून मेथडहबपर्यंत अशा शेकडो कंपन्यांची यादी देता येईल, ज्यांनी बाजारातून कोट्यवधी रुपये गोळा केले आणि गुंतवणूकदारांना वाऱ्यावर सोडले. ४१ रुपयांना आलेली व्हिक्टरी ईव्ही आज ३४ वर आहे, तर १९४ रुपयांचा मेथडहब १३६ वर कोसळला आहे. शिपवेव्हजने तर १२ रुपयांना दिलेला शेअर आज चार रुपयांच्या कवडीमोल भावात विकला जात आहे. याचा अर्थ असा की आपल्या भविष्यासाठी एक लाख रुपये गुंतवणाऱ्याच्या हातात आज जेमतेम ३०-४० हजार रुपये उरले आहेत. ही केवळ आकडेवारी नाही, तर एका सामान्य माणसाच्या स्वप्नांचा झालेला चक्काचूर आहे. प्रश्न हा उरतो की, याला जबाबदार कोण?

आजची पिढी प्रिमियमच्या नावाखाली हजारो रुपये मोजते, तेव्हा त्यांना १९९२ पूर्वीच्या भांडवल नियंत्रक व्यवस्थेचा विसर पडलेला असतो. १९९२ पर्यंत भारतात कोणत्याही कंपनीला आपली मनमानी किंमत ठरवण्याचा अधिकार नव्हता. तेव्हा अर्थ मंत्रालयांतर्गत असणारी ही संस्था कंपनीचा नफा, तिची मालमत्ता आणि इतिहास तपासून शेअरची किंमत ठरवत असे. दहा रुपयांच्या दर्शनी मूल्यावर २०-३० रुपये प्रिमियम मिळणे ही त्या काळी मोठी गोष्ट मानली जात असे. पण १९९२ मध्ये सेबी आली. आपणही मुक्त अर्थव्यवस्थेचा स्वीकार केला. इथूनच मुक्त किंमत ठरवण्याच्या पद्धतीचा भस्मासुर जन्मला. 'किंमत ठरवणे हे बाजाराचे काम आहे, आमचे नाही', असे म्हणून यंत्रणा मोकळी झाली. याच संधीचा फायदा घेत मर्चंट बँकर्स आणि विदेशी गुंतवणूकदारांनी तोट्यात चालणाऱ्या कंपन्यांचे मूल्यांकन कागदावर फुगवायला सुरुवात केली. आधी लोकांकडून हजारो कोटी रुपये गोळा करायचे आणि मग त्या पैशातून स्वतःचे प्रयोग करायचे, अशी ही घातक पद्धत रूढ झाली आहे. या मायाबाजारात मॉर्गन स्टॅनले, जेपी मॉर्गन, गोल्डमन सॅक्स किंवा स्थानिक बड्या बँकांसारखे मर्चंट बँकर्स महत्त्वाची भूमिका बजावतात. शेअरची किंमत प्रत्यक्षात हे मर्चंट बँकर्स ठरवत असतात. इथेच हिताचा मोठा संघर्ष सुरू होतो. मर्चंट बँकरला मिळणारे कमिशन आयपीओच्या एकूण आकारावर आणि शेअरच्या किमतीवर अवलंबून असते. शेअरची किंमत फुगवून लावत या बँकांचे कमिशन कोटींच्या घरात नेले जाते. त्यामुळे कंपनीचा नफा नसतानाही भविष्यातील मृगजळ दाखवून ही मंडळी मूल्यांकनाचे फुगे फुगवत राहतात.

या बँकांचे कनेक्शन केवळ कंपन्यांशी नसते, तर विदेशी संस्थात्मक गुंतवणूकदारांशीही जोडलेले असते. आयपीओ येण्यापूर्वी हे बँकर्स मोठमोठ्या रोड शोंच्या माध्यमातून एक हवा निर्माण करतात. तोट्यात चालणारी कंपनी २,१०० रुपयांचा प्रिमियम मागते, तेव्हा हे बँकर्स तांत्रिक भाषेत काही जटिल अहवालांचे सादरीकरण करतात, की सामान्य माणसाला आपण पुढचे ॲमेझॉन किंवा गुगल खरेदी करत आहोत, असे वाटते. प्रत्यक्षात ही एक एक्झिट स्ट्रॅटेजी असते.

**– मोहन कुलकर्णी**

***

# डिजिटल प्रतिकृती



डिजिटल ट्विन तंत्रज्ञान एखादी भौतिक वस्तू किंवा प्रक्रियेचे तपशीलवार आभासी प्रतिनिधित्व तयार करते. तंत्रज्ञानातील प्रगतीमुळे डिजिटल क्षेत्र आणि वास्तविक जगाचे एकत्रिकरण होऊन डिजिटल ट्विन तंत्रज्ञान एक अपरिहार्य साधन म्हणून उदयाला आले आहे. या तंत्रज्ञानामुळे उद्योगांना आकार मिळत असून व्यवहारांमध्येही क्रांती घडते आहे. आभासी जग आणि भौतिक वास्तवासाठीही हे तंत्रज्ञान वापरात येणार आहे.

सयामी जुळे वा जुळ्या व्यक्तीबद्दल आपण जाणतो. साधारण एकमेकांसारखेच दिसणारे आणि काही वेळा एकसारखाच विचार करणारे ते एक व्यक्तिमत्त्व असते. अनेक वेळा जुळे इतके सारखे दिसतात की कोण कुठला हेही ठरवणे अवघड जाते. हे झाले भौतिक विश्वाबद्दल. आता घटकाभर कल्पना करा की आपली एक प्रतिकृती डिजिटली तयार झाली तर? या प्रतिकृतीला डिजिटल ट्विन (जुळे) असे म्हटले जाते. एखाद्या वस्तूचा डिजिटल ट्विन म्हणजे तिची आभासी प्रतिकृती. ही प्रतिकृती मूळ वस्तू/व्यक्तीची इत्यंभूत माहिती मिळवून पूर्ण जीवनचक्राचे सदृशीकरण (सिम्युलेशन) करते. डिजिटल ट्विन हे एखाद्या वास्तविक वस्तूचे, प्रणालीचे किंवा प्रक्रियेचे अत्यंत तपशीलवार आभासी प्रतिबिंब असते. हे प्रतिबिंब सॉफ्टवेअरच्या सहाय्याने तयार केले जाते आणि वास्तविक वस्तूच्या सर्व वैशिष्ट्यांचे अनुकरण करते.

डिजिटल ट्विन हे एक अत्याधुनिक तंत्रज्ञान आहे, जे एखाद्या भौतिक वस्तू, प्रणाली किंवा प्रक्रियेचे अत्यंत तपशीलवार आभासी प्रतिनिधित्व तयार करते. या आभासी प्रतिनिधित्वालाच डिजिटल ट्विन म्हणतात. तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे डिजिटल क्षेत्र आणि वास्तविक जगाचे एकत्रिकरण झाले आहे. यामुळे डिजिटल ट्विन तंत्रज्ञान एक अपरिहार्य साधन म्हणून उदयाला आले आहे. या तंत्रज्ञानामुळे उद्योगांना आकार मिळतो आहे, व्यवहारांमध्येही क्रांती घडते आहे. सुरुवातीच्या काळात फक्त उत्पादनाच्या स्तरावर याची कल्पना केली होती. पण आता आभासी जगात आणि भौतिक वास्तवांसाठीही हे डिजिटल तंत्रज्ञान वापरात येणार आहे. डिजिटल ट्विन हा शब्द सगळ्यात पहिल्यांदा मिशिगन विद्यापीठात डॉ. मायकेल ग्रीव्हस यांनी २००२ मध्ये सादर केला होता. सुरुवातीच्या काळात उत्पादन क्षेत्रात ही संकल्पना मांडण्यात आली होती. त्यानंतर ही कल्पना मोठ्या प्रमाणात ॲप्लिकेशन्सचा समावेश करण्यासाठी विकसित झाली. डिजिटल ट्विनमध्ये विविध परिस्थितींचे अनुकरण करून आणि डेटाचे विश्लेषण करून भविष्यसूचक देखभाल, परिपूर्ण व्यवहार आणि उत्पादन विकासामध्ये नावीन्य आणले जाते.

भौतिक मालमत्ता आणि प्रक्रियांच्या कामगिरीचे परीक्षण, विश्लेषण आणि त्याची क्षमता वाढवण्यासाठी उत्पादन, आरोग्यसेवा, वाहतूक आणि शहरी नियोजन यांसारख्या विविध उद्योगांमध्ये डिजिटल ट्विन्सचा वापर केला जातो. हे तंत्रज्ञान वेगवेगळ्या परिस्थितींची पडताळणी करू शकते, त्याच्या परिणामांचा अंदाज लावू शकते आणि निर्णय घेण्यासाठीही मदत करू शकते.

मेटाव्हर्समध्ये एक आभासी जागा तयार केली जाते. यामध्ये वापरकर्ते डिजिटल वातावरणाशी आणि एकमेकांशी संवाद साधतात आणि डिजिटल ट्विनिंगला अनेक प्रकारे छेदतात. मेटाव्हर्स विकसित होत असताना समग्र आणि एकमेकांशी जोडलेले आभासी जग तयार करण्यासाठी डिजिटल ट्विन कणा म्हणून काम करू शकतात. हे तंत्रज्ञान वापरकर्त्यांना मेटाव्हर्समध्ये स्वतःचे अत्यंत तपशीलवार आणि अचूक प्रतिनिधित्व तयार करण्यास सक्षम बनवू शकते. यामुळे वैयक्तिक स्वरूपाचे आणि खरे असल्यासारखे अनुभव घेता येतात. उदाहरणार्थ, व्हर्च्युअल शॉपिंगमध्ये उत्पादनांचे डिजिटल ट्विन्स खरेदीचे निर्णय घेण्यासाठी वापरकर्त्यांना मदत करू शकतात. शिवाय डिजिटल ट्विन्स मेटाव्हर्समधील विविध मंच आणि यंत्रणांमधील देवाण-घेवाण सुलभ करतात. तसेच विविध आभासी वातावरणांमध्ये अखंड संवाद आणि परस्पर संवादही घडवून आणतात. या देवाण-घेवाणीमुळे परस्परसंबंधित अनुभव घेता येतात आणि जागतिक स्तरावर सहयोग आणि नवकल्पना वाढीला लागते.

डिजिटल ट्विन्स विविध क्षेत्रांमध्ये खोली, समृद्धता आणि कार्यक्षमता वाढवून मेटाव्हर्सचा लक्षणीय विस्तार करू शकतात. याव्यतिरिक्त स्मार्ट शहरे, औद्योगिक संयंत्रे किंवा नैसर्गिक वातावरण यांसारख्या संपूर्ण इकोसिस्टीमचा समावेश करण्याच्या उद्देशाने डिजिटल ट्विन वैयक्तिक प्रतिनिधित्वाच्या पलीकडे विस्तारू शकतात. रिअल-टाइम डेटा आणि सिम्युलेशन एकत्र करून हे तंत्रज्ञान बहुआयामी आणि प्रतिसादात्मक आभासी जग आणखी सक्षम करते. यामुळे त्यांच्या भौतिक समकक्षांना जवळून प्रतिबिंबित करता येते.

डिजिटल जुळे डेटा स्त्रोतांशी जोडलेले असतात. परिधान केलेल्या एका छोट्या उपकरणाद्वारे आपले डिजिटल विश्व साठवले जाते, आपण भेटलेल्या व्यक्ती, त्यांचे सोशल प्रोफाइल्स, झालेले संभाषण, व्यवहार या सर्व बाबींचा त्यात अंतर्भाव असतो. अनेक वर्षांच्या साठवणुकीनंतर या माहितीचे एआय तंत्राद्वारे पृथक्करण करून काही विशिष्ट साचे, वर्तणुकीचे प्रकार तयार केले जातात. या संकल्पनेचा उपयोग आपल्याला स्मरण केलेल्या गोष्टी साठवण्यासाठी करता येऊ शकतो. मानवी मेंदूमध्ये ही अफाट क्षमता आहे. पण कालानुरूप त्यात त्रुटी निर्माण होतात. अनेकांना विस्मरण होते, एखादी व्यक्ती समोर येते पण नाव आठवत नाही. कधी कधी नाव आठवते, पण व्यक्ती डोळ्यांसमोर येत नाही. इथे आपला डिजिटल जुळा आपल्याला मदत करू शकतो. एआयमधील प्रेडिक्टिव्ह अनॅलिटिक्स तंत्रामुळे आपण एखाद्या व्यक्तीला वा एखाद्या ठिकाणी जायच्या आधी त्यासंबंधी माहितीची खातरजमा, उजळणी आधीच करू शकतो. काही टूल्स तुम्हाला हवी तेव्हा रिअलटाइम अर्थात मदत करू शकतात. आपला घसा बसला असेल तर, आपल्या वतीने संभाषणही करू शकतात. यात आपल्या आवाजाचे, लकबींचे पृथक्करण केले असते. फक्त यासाठी आपले संभाषण (अनेक वर्षांचे) रेकॉर्ड केले जाते. यासाठी वेअरेबल (परिधान केलेले संगणकीय उपकरण) वापरले जाते. 'प्लॉड' या एआय उद्योगाने नोट नावाचा एक स्लिम सक्षम ऑडिओ रेकॉर्डर विकसित केला आहे.

हा ऑडियो तुमच्या फोनच्या मागील बाजूस अडकवला जाऊ शकतो किंवा तुमचे संभाषण रेकॉर्ड करण्यासाठी, हावभाव रेकॉर्ड करण्यासाठी आणि सारांशित करण्यासाठी शर्टच्या खिशात ठेवला जातो. हे तंत्र नेहमी तुमचे संभाषण ऐकते आणि कालांतराने तुमचे व्यक्तिमत्त्व, तुमचा प्राधान्यक्रम, संवाद जाणून घेत काही वर्षांत तुमचे डिजिटल जुळे तयार करते. या तंत्रात आणि चॅटजीपीटीसारख्या जनरेटिव्ह एआय टूल्समध्ये बराच फरक आहे. चॅटजीपीटी सार्वत्रिक डिजिटल माहितीसंग्रहाचे पृथक्करण करते आणि माहिती निर्माण करते. इथे तसे नाही, फक्त आपला डिजिटल ट्विन आपल्याशी संबंधित माहितीचे पृथक्करण करतो आणि गरज पडल्यास आपली जागादेखील घेतो. यामुळे आपल्या मानवी मेंदूच्या क्षमता कमी होतील असे काहीजणांना वाटते. गुगल मॅप वापरून आपण दिशा शोधतो. इच्छित स्थळ शोधतो. पूर्वी आपण स्मरणशक्तीला ताण देऊन विचारत विचारत एखादा पत्ता शोधत असू. एकदा कष्टाने पत्ता शोधला की कायम लक्षात राहत असे. आता हेच तंत्र सर्वत्र हातपाय पसरू लागले आहे. यामुळे भविष्यात माणसाचे आयुष्य नक्कीच सुसह्य होणार आहे.

फक्त एक मोठा धोका आहे तो सुरक्षेचा. आपल्याबद्दल सर्व माहिती सायबर गुन्हेगारांनी चोरली तर ते दुरुपयोग करू शकतात. सर्वच तंत्रांना असा धोका असतोच. त्यामुळे जास्त काळजी घेतली पाहिजे हे वास्तव आहे. तंत्रज्ञान चहुदिशांनी विस्तारत असून प्रगतीची नवनवी कवाडे उघड होत आहेत. त्यातून नित्यनेमाने नवे तंत्रज्ञान जुन्या तंत्रज्ञानाची जागा घेत आहे. यातूनच मानवी विकासाला नवी दिशा मिळत आहे. त्याचा सगळ्यात मोठा फायदा उद्योग आणि सेवाजगत घेत आहे. माहिती तंत्रज्ञान क्षेत्र अशाने भराऱ्या घेत राहणार आहे. त्यात तगण्यासाठी आणि स्वविकास साधण्यासाठी तंत्रज्ञाबरोबरच सामान्यांना आणि युवा पिढीला सतत तयारीत राहावे लागणार आहे.

**– डॉ. दीपक शिकारपूर**

***

# टीनेज मुलांशी वागण्याच्या प्रभावी स्ट्रॅटेजी

आपली आजकालची अर्थात म्हणजेच ज्यांना असं वाटतं की आम्ही सगळ्यात श्रेष्ठ आहोत आणि आमच्या इच्छा आणि गरजा यांना सगळ्यात आधी प्राधान्य द्यायला हवं. इतरांच्या प्रयत्नांची, कष्टांची त्यांना जाणीव नसते. ते समजतात इतर लोक जणू आपली सेवा करण्यासाठीच आहेत. बाहेर ते अतिशय जबाबदारीने आणि छान वागतात, पण घरात मात्र परिस्थितीचा फायदा घेण्यात ते हुशार आणि तरबेज असतात. हा आपला हक्कच आहे असं वाटून घेण्याची मानसिकता या मुलांची असेल, तर त्या मुलांचे मानसिक आरोग्य धोक्यात येऊ शकते. मुलांना निराशा, एकटेपण जाणवते. त्यातूनच मग खोलीत स्वतः ला जणू कोंडून घेणं सुरू होतं. कारण आपल्या गरजा कशा पूर्ण कराव्यात हे त्यांना कळत नाही आणि इतरांच्या अपेक्षा मुलं पूर्ण करू शकत नाही. यातूनच इतरांचे लक्ष वेधून घेण्याचा प्रयत्न मुलं करू लागतात, कारण मनातून ते जणू रिकामे झालेले असतात. पालकांनो याचाच अर्थ असा आहे की, आपण आपल्या मुलांबाबत ओव्हर पॅरेंटिंग करतोय आणि या जगातील आव्हानांना तोंड देण्यासाठी त्यांना पूर्णपणे तयार करत नाही आहोत.

मुलं जेव्हा हा आमचा हक्कच आहे असं समजतात तेव्हा हा माईंडसेट धोकादायक ठरू शकतो. अशा माईंडसेटचे टीनेजर्स तयार करायचे नसतील तर या गोष्टी लक्षात ठेवू या

१) मुलांना स्वतः कमाई करण्यासाठी प्रोत्साहन द्या. त्यांना वस्तूची किंमत कळायला हवी असे जर तुम्हाला वाटत असेल, तर एखादा आठवडा मुलांना घराची छोटीशी का होईना आर्थिक जबाबदारी सोपवू शकता. मुलांना पुढील महिन्यात घेऊ इच्छिणाऱ्या आवडत्या वस्तूच्या खरेदीसाठी किमान २५% रकमेची बचत करायला सांगू शकता. आपण मुलांना वारेमाप खेळणी, गॅजेट्स, वस्तू घेऊन देत असू, तर मग हळूहळू त्यांना हा आपला हक्कच आहे असे वाटू शकते. यासाठीच मुलं टीनेजमधील असल्याने सुट्ट्यांमध्ये माफक प्रमाणात काम व कमाई करू देत म्हणजे कामाचे कष्ट आणि पैशाची कमाई याचे महत्त्व मुलांना कळेल.

२) मुलांना अपयशी होऊ द्या.खूप पालकांना हे वाक्य ऐकायला आणि पचवायला जड जाईल. पण या जगात कसं जगलं पाहिजे, नाही तर कोणते परिणाम होऊ शकतात, या गोष्टींची जाणीव मुलांना व्हायलाच हवी. याशिवाय परिस्थितीशी जुळवून कसे घ्यायचे याचं भान त्यांना येणार नाही. जेव्हा तुम्हाला हे दिसू लागेल की ते परिस्थितीशी झटापट करत आहेत तेव्हा जरूर तुम्ही त्यात उडी घ्या, त्यांना मदत करा. उदाहरणार्थ अभ्यासातील ग्रेड्स मिळवण्यासाठीच्या अडचणी किंवा वागण्याचे प्रश्न याबाबत तुम्ही त्यांना मदत करू शकता. पण अपयश आले तर काय परिणाम होतात तेही त्यांना कळूच दे. कारण सतत मदत करण्याने आपण त्यांच्या भविष्यातील वाटचालीसाठी अडथळे तयार करत असतो हे लक्षात ठेवा. अपयश हा प्रॉब्लेम सोडवण्यासाठी मुलांना तयार करणारा एक असा मार्ग आहे जो त्यांच्या कृतीच्या, वागण्याच्या परिणामांची जाणीव मुलांना देतो. म्हणून अपयशाकडे सकारात्मक पद्धतीने बघा. आपण प्रयत्न केले नाहीत, योग्य तो सराव केला नाही तर त्याचे परिणाम काय होऊ शकतात हे कळले की मग मुलं योग्य त्या पद्धतीने रोज अभ्यास करू लागतील. अपेक्षित वागणं का आवश्यक आहे हे त्यांना लक्षात येईल. वही विसरणं, प्रोजेक्ट अपूर्ण ठेवणं, पुरेसा अभ्यास न केल्याने टेस्टमध्ये नापास होणे यातून हे परिणाम त्यांच्या लक्षात येतील आणि त्यांना कळेल की, आपण जबाबदारी नीट पार पाडली नाही, तर दुसऱ्यावर ब्लेम करून उपयोग नाही. यामुळे आपण फ ेल्युअर ठरणार आहोत. मुलं अपयशी व्हावीत किंवा झाली, तर यासाठी तुम्ही जबाबदार नाही पालकांनो. तुम्ही प्रत्येक वेळेला त्यांना प्रॉब्लेम सोडवायला मदत करायला उपलब्ध नसणार आहात. तुम्ही फक्त फॅसिलिटेटर अर्थात त्यांना प्रेरणा देऊ शकता. अनुकूल परिस्थिती निर्माण करू शकता. अपयश आले की मुले अंतर्मुख होऊन विचार करू लागतील आणि त्यामुळे मुलं स्वतःमधील गुणवैशिष्ट्ये, ताकद आणि परिस्थितीशी जुळवून घेण्याची लवचिकता शोधू आणि वापरू शकतील. ३) घरातील जबाबदाऱ्या आणि मुलांची सेल्फ सफिशियन्सी मुलांवर सोपवायला हवी. यासाठी मुलांना उत्तेजन द्यायला हवं. या वयातील मुलं स्वतःहून मोटिवेट होत नाहीत. कधी कधी तर ती आपल्याला चक्क आळशी वाटतात. काही वर्षांनंतर तुमची ही पाखरे आपल्या घरट्यातून दूर उडून जाणार आहेत. तत्पूर्वीच आपण त्यांना स्वतंत्र जगात जगण्याची कौशल्ये शिकवणं आवश्यक आहे. मगच ते पुढे आत्मविश्वासाने जाऊ शकतील. स्वतःची काळजी घेऊ शकतील. आपल्यावर टाकलेल्या जबाबदारीबाबत आपण अकाउंटेबल आहोत याची जाणीव त्यांना द्या. एवढंच नव्हे तर या गोष्टींची जबाबदारी न घेतल्यास होणाऱ्या परिणामांची जाणीव द्या. एका विशिष्ट वयानंतर किंबहुना वयाच्या प्रत्येक टप्प्यावर मुलांना कामं सोपायलाच हवीत. मुलं आळशीपणा करतात, कामचुकारपणाने वागतात म्हणून त्यांच्या मागेही लागावं लागतं. पण किती दिवस आपण मुलांचे काम करणार आहोत. सगळं आयतं हातात देणं, रूम सर्विस देणं ताबडतोब बंद करा. तुमच्या मुलांकडून असणाऱ्या अपेक्षा स्पष्टपणे त्यांना सांगा. होमवर्क आणि इतर कामांचा बहाणा करून ते कामे टाळतात. पुढे ढकलतात पण तुम्ही ठाम राहा. काम पूर्ण न झाल्यास मुलांना दिल्या जाणाऱ्या सुख-सुविधांमध्ये कपात करा. याचा अर्थ सारख्या सूचना द्या, मागे लागा असा नाही पण एकदा स्पष्ट शब्दात सूचना द्या.

४) मुलांसाठी बाउंड्रीज आखा. मुलांच्या चुकीच्या वागण्याला प्रतिबंध करण्यासाठी नियम तयार करून पाळायला लावणे, बाउंड्री चाकण जबाबदाऱ्या टाकणं हे यासाठी अँटी डॉट्स आहेत. मुलांना जसा आपला मालकी हक्क समजतो, तर तशी जबाबदारीही त्यांनी घ्यायला हवी. टीनेजर मुलांना त्यांचं सोशल मीडियावर अकाउंट नसेल तर जणू आयुष्य संपून गेल्यासारखं वाटतं. किंवा एखाद्या कॉन्सर्टला जाता आलं नाही, रात्री उशीरापर्यंत थांबता आलं नाही, फॅशनेबल कपडे घालता आले नाहीत की आयुष्यात काही आनंद नाही असं त्यांना वाटतं. या गोष्टींसाठी त्यांना परवानगी मिळावी म्हणून ते मागे लागतील. स्वतःची बाजू मांडतील आणि या गोष्टींचा उपयोग होत नाही हे लक्षात आलं, की मग तुम्हाला मुद्दामच टाकून बोलतील. इमोशनल ब्लॅकमेल करतील.खरं म्हणजे तुम्ही पालक म्हणून आतापर्यंत मुलांना चांगले संस्कार दिलेले असतात. पण या वयात मात्र मुलांना या जगात टिकण्यासाठी तयार करणे हे तुमचं पहिलं कर्तव्य आहे. पालकांनी त्यामुळे अशावेळी जेव्हा मुलं तुमच्याकडे हट्ट करतात तुम्हाला इमोशनल ब्लॅकमेल करतात तेव्हा ग्रेसफुली तरीही प्रेमाने मुलांसाठी मर्यादा हव्यात. एकदा नाही म्हणालात, तर त्यावर ठाम राहा. आपलं मत बदलू नका. मुलांबरोबर संघर्ष टळावा म्हणून नाहीला थोड्या वेळाने हो म्हणू नका.

५) मुलांमध्ये कृतज्ञता व्यक्त करण्याची भावना निर्माण करा. टीनेजर वयातील मुलं बहुधा छोट्या-छोट्या गोष्टींसाठी कृतज्ञता व्यक्त करत नाहीत. या गोष्टी त्यांना फार महत्त्वाच्या वाटत नाहीत. बाकीचे लोक जणू त्यांच्यासाठी काम करायलाच आहेत असं त्यांना वाटतं. मात्र त्यांना स्वतःला ताबडतोब ग्रॅटिफिकेशन हवे असते, म्हणूनच मुलांना कृतज्ञता व्यक्त करायला त्यांच्या मनात तसा एटीट्यूड तयार करायला हवा. जगात किती माणसे दुःख, वेदना सहन करून आपल्या आयुष्यात संघर्ष करत असतात याची जाणीव त्यांना द्यायलाच हवी. यासाठी अशा डॉक्युमेंटरी, पुस्तकं मुलांना बघायला आणि वाचायला प्रवृत्त करा. आपण समाजाचं काही देणं लागतो हे त्यांच्याशी तुम्ही बोलताना जरूर मांडा. तुमच्या स्वतः च्या वागण्यातून मुलांसमोर आदर्श ठेवा. तुमची पहिली नोकरी तुमचा पगार तुम्ही केलेला संघर्ष याबद्दल बोला.

संध्याकाळी किंवा रात्री जेवणानंतर त्यांना फिरायला घेऊन जा. चालता चालता त्यांच्याशी या गप्पा जरूर मारा. म्हणूनच पालकांनो हे सारं मला मिळालंच पाहिजे, हे माझ्या मालकीचे आहे असा भाव मनात पोसणारी मुलं आपल्याला मोठी करायची नाहीत, तर एक असा माणूस याच्यावर तुम्ही प्रेम कराल, तो तुम्हाला आवडेल, त्याचा आदर कराल असं मूल तुम्हाला घडवायचं आहे. अजूनही उशीर झाला नाही. प्रेम द्या, पण थोडं कणखरपणेच. विश्वास ठेवा पालकांनो, आज हे सारं मुलांना आवडलं नाही तरी ते जेव्हा मोठे होतील, तेव्हा तुम्ही त्यांना ज्या पद्धतीने मोठं केलं त्याबद्दल ते तुम्हाला नक्कीच एप्रिशिएट करतील.

**–डॉ. स्वाती गानू**

***

# महिला शेतकऱ्यांच्या सक्षमीकरणासाठी ऐतिहासिक पाऊल

## गोदरेज ॲग्रोव्हेट आणि उमेद यांच्यात सामंजस्य करार; ५ हजारांहून अधिक महिला शेतकऱ्यांना आधुनिक शेतीचे प्रशिक्षण

आत्ताच एक्सप्रेस

**मुंबई** – राज्यातील महिला शेतकऱ्यांना सक्षम करण्याच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण आणि दूरगामी निर्णय घेत, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली आणि महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (उमेद) यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला आहे. या करारामुळे राज्यातील कापूस उत्पादक नऊ जिल्ह्यांमधील पाच हजारांहून अधिक महिला शेतकऱ्यांना शाश्वत, आधुनिक आणि नफा वाढविणाऱ्या शेती पद्धतींचे प्रशिक्षण मिळणार आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी बोलताना सांगितले की, ''महाराष्ट्रातील शेतकरी हे राज्याच्या अर्थव्यवस्थेचा कणा आहेत. शेतीवर अवलंबून असलेल्या हजारो कुटुंबांमध्ये महिलांची भूमिका अत्यंत निर्णायक आहे. गोदरेज ॲग्रोव्हेटसोबतचा हा करार शाश्वत शेती, महिला सक्षमीकरण आणि ग्रामीण अर्थव्यवस्था बळकट करण्याच्या राज्य शासनाच्या कटिबद्धतेचे प्रतीक आहे.''



पहिल्या टप्प्यात नऊ जिल्ह्यांचा समावेश

या उपक्रमाच्या पहिल्या टप्प्यात नागपूर, अमरावती, यवतमाळ, वाशिम, परभणी, जळगाव, बीड, अकोला आणि नांदेड या नऊ जिल्ह्यांचा समावेश करण्यात आला आहे. सुमारे ५० हजार एकर क्षेत्रावर शेती करणाऱ्या ५ हजारांहून अधिक महिला शेतकरी आणि १०० स्वयंसहायता गट या योजनेचा थेट लाभ घेणार आहेत.

आधुनिक प्रशिक्षणावर भर

या सामंजस्य कराराअंतर्गत महिला शेतकऱ्यांना

शाश्वत कापूस उत्पादन तंत्रज्ञान

माती आरोग्य व्यवस्थापन

पाणी बचत व स्मार्ट सिंचन पद्धती

खर्च कमी करून उत्पादन वाढविण्याचे मार्ग

बाजारपेठेशी थेट जोडणी व उत्पन्नवाढीचे उपाय

याबाबत प्रत्यक्ष शेतावर प्रशिक्षण, कार्यशाळा आणि तज्ज्ञ मार्गदर्शन दिले जाणार आहे.

पुढील तीन वर्षांत मोठा विस्तार

राज्य शासनाने या उपक्रमाचा आवाका वाढवण्याचा निर्धार केला असून, पुढील तीन वर्षांत ५०० हून अधिक स्वयंसहायता गटांपर्यंत हा उपक्रम विस्तारण्यात येणार आहे. यासोबतच कापसाबरोबरच मका व इतर पिकांचे उत्पादन घेणाऱ्या महिला शेतकऱ्यांनाही या योजनेत समाविष्ट करण्याचा मानस आहे.

ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना

हा करार केवळ प्रशिक्षणापुरता मर्यादित नसून, महिला शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवणे, त्यांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनवणे आणि ग्रामीण भागातील अर्थचक्र मजबूत करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. शासन, खासगी क्षेत्र आणि स्वयंसहायता गट यांचा समन्वय साधत राबविण्यात येणारा हा उपक्रम भविष्यात राज्यातील महिला–केंद्रित शेती विकासासाठी आदर्श ठरण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## माहूरजवळील शेख फरीद वझरा धबधब्यात बुडून तरुणाचा दुर्दैवी मृत्यू; परिसरात हळहळ

आत्ताच एक्सप्रेस



**माहूर** – माहूर परिसरातील प्रसिद्ध धार्मिक व पर्यटनस्थळ असलेल्या शेख फरीद वझरा येथील धबधब्यात बुडून एका ३२ वर्षीय तरुणाचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना आज दुपारी घडली. या घटनेमुळे संपूर्ण परिसरात शोककळा पसरली आहे. मृत तरुणाचे नाव शेख इर्शाद शेख शफी ( रा. गोकुंदा, ता. किनवट) असे असून, तो मित्रांसह शेख फरीद बाबा दर्गा येथे दर्शनासाठी आला होता. दुपारी अंदाजे १ ते २ वाजेदरम्यान दर्शनानंतर जवळच असलेल्या धबधब्याजवळ मित्रांसोबत फोटो काढत असताना अचानक त्याचा तोल गेला. पाण्याची खोली व प्रवाहाचा अंदाज न आल्याने तो थेट खोल पाण्यात पडला. धबधब्यातील पाण्याचा जोर अधिक असल्याने इर्शाद पाण्यात बुडाला. ही घटना लक्षात येताच आजूबाजूच्या नागरिकांनी व त्याच्या मित्रांनी तातडीने मदत करत त्याला पाण्याबाहेर काढले. मात्र तोपर्यंत खूप उशीर झाला होता. पाण्यात बुडाल्याने त्याचा घटनास्थळीच मृत्यू झाला असल्याचे स्पष्ट झाले. घटनेची माहिती मिळताच माहूर पोलीस घटनास्थळी दाखल झाले. पंचनामा करून मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी पाठविण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास माहूर पोलीस करत असून, प्राथमिक तपासात ही घटना अपघाती मृत्यूची असल्याचे सांगण्यात येत आहे. दरम्यान, शेख फरीद वझरा परिसरात मोठ्या प्रमाणावर भाविक व पर्यटक येत असतात. धबधब्याच्या ठिकाणी कोणतीही संरक्षक व्यवस्था नसल्याने अशा दुर्घटना घडत असल्याची भावना नागरिकांतून व्यक्त होत आहे. प्रशासनाने या ठिकाणी सुरक्षा उपाययोजना, इशारे व निर्बंध लावावेत, अशी मागणीही होत आहे. या दुर्दैवी घटनेमुळे शेख इर्शाद शेख शफी यांच्या कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असून, गोकुंदा व माहूर परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

## हातभट्टीच्या अड्ड्यावर छापा, ७०० लिटर मोहफुल रसायन जप्त; गोकुंद्यात अवैध दारू विक्रीवरही कारवाई

आत्ताच एक्सप्रेस

**किनवट** – किनवट पोलिसांनी आज केलेल्या जोरदार मासरेड कारवाईत अवैध दारू व्यवसायावर मोठा घाव घालत दोन ठिकाणी यशस्वी छापे टाकले. या कारवाईत हातभट्टी दारू निर्मितीसाठी वापरले जाणारे मोठ्या प्रमाणातील साहित्य जप्त करण्यात आले असून अवैध दारू विक्रीप्रकरणी स्वतंत्र गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

किनवट पोलीस ठाणे हद्दीतील मोजे धामणदरी (किनवट) येथे धाड टाकली असता, हातभट्टी गावठी दारू तयार करण्यासाठी साठवून ठेवलेले अंदाजे ७०० लिटर मोहफुल रसायन पोलिसांच्या हाती लागले. या मुद्देमालाची अंदाजे किंमत ३५,००० रुपये इतकी असून संबंधित प्रकरणी कायदेशीर कारवाई सुरू करण्यात आली आहे. सदरील कारवाई ही बीट अधिकारी प्रल्हाद जाधव यांच्यासह बीट जमादार पुरी व चालक बिरादार यांच्या वतीने करण्यात आली.या कारवाईमुळे परिसरात सुरू असलेल्या बेकायदेशीर दारू उत्पादन साखळीला मोठा धक्का बसला आहे.

याच कारवाईच्या पुढील टप्प्यात गोकुंदा येथे अवैधरित्या देशी दारूची विक्री सुरू असल्याची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी तात्काळ कारवाई करत १,४८० रुपये किमतीची देशी दारू जप्त



केली. या प्रकरणातही संबंधितांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अवैध दारू व्यवसायामुळे कायदा–सुव्यवस्था, सार्वजनिक आरोग्य व सामाजिक शांततेला धोका निर्माण होत असल्याने अशा कारवायांवर भविष्यातही कठोरपणे लक्ष ठेवले जाईल, असा इशारा पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन किनवट यांनी दिला आहे. किनवट पोलिसांच्या या धडक कारवाईमुळे अवैध दारू व्यावसायिकांमध्ये खळबळ उडाली असून नागरिकांकडून या कारवाईचे स्वागत करण्यात येत आहे.

## मुगट जिल्हा परिषद शाळेमध्ये माजी विद्यार्थी मेळावा उत्साहात संपन्न

आत्ताच एक्सप्रेस

**मुदखेड** – दि.०१ फेब्रुवारी रोजी रविवारी मुदखेड तालुक्यातील मुगट येथील जिल्हा परिषद शाळेत सकाळी ११वाजता माजी विद्यार्थी व माजी शिक्षक मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी श्री गजानन जोशी (राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त शिक्षक),प्रमुख पाहुणे म्हणून श्री देविदास पवार (माजी मनपा आयुक्त )हे होते. हा मिळावा शाळेतील सण १९६५ ते २०१५ या कालावधीतील शालेय शिक्षण घेतलेल्या माजी विद्यार्थी तसेच माजी शिक्षकांसाठी शाळेकडून आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक शाळेचे मुख्याध्यापक तुकाराम मुंगरे यांनी सुरुवातीला केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष व प्रमुख पाहुणे यांच्या हस्ते महामानवाच्या प्रतिमेचे पूजन व दीप प्रज्वलन करण्यात आले.



शाळेत तत्कालीन मुख्याध्यापक, शिक्षक म्हणून कार्य केलेल्या उपस्थित सर्वांचा शाल व पुष्प देऊन माजी विद्यार्थ्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी जवळपास शाळेतील २५ माजी मुख्याध्यापक ,माजी शिक्षक यांनी या मेळाव्यासाठी आवर्जून उपस्थिती लावली होती. माजी विद्यार्थी मेळाव्याच्या निमित्ताने मुंबई, पुणे, छ.संभाजीनगर येथून माजी विद्यार्थी व शिक्षक आले होते. या शाळेचे माजी विद्यार्थी विविध क्षेत्रात आपल्या कार्याचा ठसा उमटवत आहेत तर अनेक जण मोठ्या पदावर विराजमान होऊन सेवानिवृत्त झाले आहेत. या माजी विद्यार्थी मेळाव्याच्या निमित्ताने शाळेतील माजी शिक्षकांनी आपले मनोगत मांडले व शालेय जीवनातील आपल्या जुन्या आठवणींना उजाळा दिला त्यात एस. के. पचलिंग सर, बी.टी पाटील सर, नारायण कुलकर्णी सर, चंडीदास देशपांडे सर, पी एम.पेंटेवाड सर, आदींनी आपले मनोगत यावेळी मांडले. माजी विद्यार्थी यांनी सुध्दा शालेय जीवनातील आपल्या जुन्या आठवणींना याप्रसंगी उजाळा दिला. या प्रसंगी माझी विद्यार्थी यांच्याकडून शाळेला एक प्रिंटर, १५ पांढरे फळे या वस्तू भेट दिल्या सर्वात शेवटी कार्यक्रमाचे अध्यक्ष व प्रमुख पाहुणे यांनी आपले मनोगत यावेळी व्यक्त केले. शाळेचे मुख्याध्यापक यांनी हा एक चांगला उपक्रम हाती घेतला आहे. दरवर्षी आपण हा उपक्रम अशाच पद्धतीने राबवावा असं मनोगत यावेळी त्यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचाल ज्ञानेश्वर मरकंटे (शिक्षक) आशिष कल्याणे यांनी केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेतील शिक्षक व कर्मचारी ,माजी विद्यार्थी, शालेय समिती यांनी परिश्रम घेतले. मुगट जिल्हा परिषद शाळेत प्रथमच हा माजी विद्यार्थी मेळावा आयोजित करण्यात आला होता. त्या निमित्ताने मोठ्या प्रमाणात शाळेमध्ये माजी विद्यार्थी माजी शिक्षक यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. हा नवीनच उपक्रम शाळेमध्ये प्रथमच राबवला त्यामुळे शाळेतील या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## विद्रोही मराठी साहित्य संमेलनाच्या संपर्क कार्यालयाचे उद्घाटन व बोधचिन्हाचे लोकार्पण

आत्ताच एक्सप्रेस

**नांदेड** – नांदेड येथे दि. २८ फेब्रुवारी व १ मार्च २०२६ रोजी होणाऱ्या विसाव्या विद्रोही मराठी साहित्य संमेलनाच्या तयारीने वेग घेतला आहे. या पार्श्वभूमीवर रविवार, दि. १ फ ेब्रुवारी २०२६ रोजी गुरुगोविंद सिंग स्टेडियम, गाळा क्रमांक १२ येथे संमेलनाच्या संपर्क कार्यालयाचे उद्घाटन ज्येष्ठ समीक्षक व अनुवादक डॉ. भगवंत क्षीरसागर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी संमेलनाच्या बोधचिन्हाचे लोकार्पण नांदेडचे सुप्रसिद्ध चित्रकार श्रीरंग केरबाजी खानजोडे यांच्या हस्ते करण्यात आले. हे बोधचिन्ह कलाकार संतोष घोंगडे यांनी साकारले आहे.

उद्घाटनप्रसंगी बोलताना डॉ. भगवंत क्षीरसागर म्हणाले की, आज समता, स्वातंत्र्य व बंधुत्व या लोकशाही मूल्यांची पायमल्ली होत असताना विद्रोही भूमिका घेणे ही साहित्यिक व कलावंतांची नैतिक जबाबदारी आहे. जाती–पाती, वर्गभेद व लिंगभेद यांच्या बुरसटलेल्या चौकटी भेदून तथागत गौतम बुद्धांच्या विचारांना केंद्रस्थानी ठेवणारी विद्रोही साहित्यपरंपरा समाजाला योग्य दिशा देईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

चित्रकार श्रीरंग खानजोडे यांनी बोधचिन्हाबाबत बोलताना ते विद्रोही विचारांचा वारसा आणि संघर्षशील वाटचालीचे प्रतीक असल्याचे स्पष्ट केले.

या कार्यक्रमास विद्रोही सांस्कृतिक चळवळीच्या राज्याध्यक्षा प्रा. प्रतिमा परदेशी, राज्य संघटक किशोर ढमाले, संमेलनाचे स्वागताध्यक्ष राहुल प्रधान, मुख्य निमंत्रक डॉ. राजेंद्र गोणारकर, कोषाध्यक्ष प्रा. डॉ. अनंत राऊत, मुख्य संयोजक शिवाजीराव गावंडे व डॉ. विजयकुमार माहुरे, यशवंत मकरंद, डॉ. बालाजी पोतुलवार, डॉ. विठ्ठल भंडारे,इंजि. विवेक मवाडे, डॉ. संतोष हंकारे, हेमंत कारले,डॉ. जे. टी. जाधव, दिगंबर घायाळे, पवन जगडमवार यांची प्रमुख उपस्थिती होती.




कार्यक्रमाचे प्रास्ताविक विद्रोही सांस्कृतिक चळवळीच्या राज्याध्यक्ष प्रा. प्रतिमा परदेशी यांनी केले. सूत्रसंचालन पडॉ. राजेंद्र गोणारकर यांनी केले, तर आभार प्रदर्शन डॉ. भीमराव हटकर यांनी केले. यावेळी स्थानिक पदाधिकारी, लेखक, साहित्यिक व साहित्यप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते. संपर्क कार्यालय सुरू झाल्यामुळे संमेलनाच्या नियोजन व कार्यवाहीला अधिक गती मिळणार असल्याचे आयोजकांनी सांगितले.



## मांडवीत मोकाट वळूचा हल्ला; आदिवासी युवक गंभीर जखमी

आत्ताच एक्सप्रेस

**मांडवी** – मांडवी येथे मोकाट वळूच्या धडकेत एका आदिवासी युवकास गंभीर दुखापत झाली असून त्याच्यावर मांडवी येथील शासकीय रुग्णालयात तातडीचे उपचार सुरू आहेत. घटनेची माहिती मिळताच भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते प्रफुल्लजी राठोड आणि तंटामुक्त समितीचे अध्यक्ष कुंदनभाऊ पवार यांनी रुग्णालयात धाव घेऊन जखमी युवकाची प्रकृती जाणून घेतली.

यावेळी त्यांनी संबंधित प्रशासनास मोकाट वळूचा तात्काळ बंदोबस्त करण्याचे स्पष्ट निर्देश दिले. गाव व परिसरात मोकाट जनावरांमुळे नागरिकांच्या सुरक्षिततेला धोका निर्माण होत असल्याने त्वरित उपाययोजना करण्याची मागणी यानिमित्ताने पुन्हा पुढे आली आहे. प्रशासनाने तत्काळ कारवाई करून अशी पुनरावृत्ती होऊ नये, अशी अपेक्षा नागरिकांनी व्यक्त केली आहे.

## श्री शिरोमणी संत नरहरी महाराज पुण्यतिथी ७४० उत्सवा निमित्ताने आज ज्ञानेश्वर महाराज चोतमल आळंदीकर यांच्या कीर्तनाचा कार्यक्रम

आत्ताच एक्सप्रेस

**हिंगोली**– हिंगोली जिल्ह्यातील सर्व भाविक भक्तांना कळविण्यात आनंद होतो की यावर्षी हिंगोली शहर अलगत असलेल्या अकोला बायपास संत नामदेव नगर येथील श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरामध्ये श्री शिरोमणी संत नरहरी महाराज यांच्या ३७० व्या पुण्यतिथी निमित्त विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून यावेळी आळंदी येथील प्रसिद्ध असलेले हभप ज्ञानेश्वर महाराज चौतमल यांचे कीर्तन आयोजित करण्यात असल्याची माहिती संत शिरोमणी नरहरी महाराज उत्सव समितीचे सदस्य तथा बळसोंड नगरीचे माजी उपसरपंच किरण डहाळे यांनी दिली आहे.

सदरील कार्यक्रम हिंगोली शहरालगत असलेल्या अकोला बायपास बळसोंड येथील संत नामदेव नगर मध्ये आयोजित करण्यात आला असून यावेळी आपण सर्वांनी या शुभप्रसंगी उपस्थित राहून दर्शनाचा व महाप्रसादाचा लाभ घ्यावा, अशी विनंती संत नामदेव नगर,संत नरहरी व विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीच्या वतीने करण्यात आली आहे.

कार्यक्रम रूपरेषा पुढील प्रमाणे आहे.

दिनांक ४ फेब्रुवारी कीर्तन सेवा ह भ प ज्ञानेश्वर महाराज (चौतमल) आळंदीकर यांचे कीर्तन वेळः सायंकाळी ६ ते ९, महाप्रसाद वितरणः दुपारी २ ते ५,स्थळ.संत नामदेव नगर, संत नरहरी व विठ्ठल रुक्मिणी मंदिर, बळसोंड.

## राष्ट्रीय चर्मकार महासंघातर्फे राष्ट्रसंत गुरु रविदास महाराज यांची जयंती उत्साहात साजरी

आत्ताच एक्सप्रेस

**उदगीर** – राष्ट्रीय चर्मकार महासंघ उदगीर तालुक्याच्या वतीने उदगीर येथील राष्ट्रीय चर्मकार महासंघ लातूर जिल्हा ग्रामीण संपर्क कार्यालय उदगीर येथे एक विचार समतेचा, एक विचार नीतीचा ना धर्माचा, ना जातीचा, राजा माझा मातीचा असे महान संत शिरोमणी जगद्गुरु रविदास महाराज यांची ६४९ वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

यावेळी सर्वप्रथम राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे राज्य उपाध्यक्ष नवनाथ गायकवाड यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन, पुष्पहार अर्पण व विनम्र अभिवादन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. तसेच उपस्थित संघटनेचे पदाधिकारी व समाजातील कार्यकर्त्यांच्या वतीने प्रतिमेस पुष्प अर्पण करण्यात आले.

याप्रसंगी राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे लातूर ग्रामीण जिल्हाध्यक्ष मधुकर वाघमारे, गंगाधर गिरगावकर व नवनाथ गायकवाड यांनी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन चंद्रकांत कल्याणकर यांनी केले तर आभार पांडुरंग वाघमारे यांनी



मानले. यावेळी रोहिदास लोहकरे, राजकुमार करंजे, मारोती भुजबळे, बालाजी राम माने, रवी वाघमारे, सूर्यकांत कांबळे, संदीप वाघमारे, दशरथ लोहकरे, बालाजी सदानंदे, नरेश वाघमारे, गणेश कांबळे व अनिल वाघमारे यांच्यासह राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे पदाधिकारी, कार्यकर्ते व चर्मकार समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### बारावीची १० फेब्रुवारी तर दहावीची २० फेब्रुवारीपासून परिक्षा

# विद्यार्थ्यांनो सावधान! कॉपी आढळल्यास होणार कडक कार्यवाई, वर्गखोल्यात राहणार सीसी टिव्ही कॅमेऱ्याची नजर

## परभणी जिल्ह्यात कॉपीमुक्त अभियान प्रभावीपणे राबवावे-जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण

**आत्ताच एक्सप्रेस**

परभणी – महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत दि. १० फेब्रुवारीपासून बारावी तर दि. २० फेब्रुवारी २०२६ पासून दहावीच्या परिक्षा घेतल्या जाणार आहेत. परभणी जिल्हयात या परिक्षा कॉपीमुक्त वातावरणात पार पडण्यासाठी शिक्षण विभागांनी आवश्यक ती खबरदारी घ्यावी. विद्यार्थ्यांकडून परिक्षेत कोणत्याही गैरमार्गाचा अवलंब होणार नाही, याबाबत दक्षता घेण्यात यावी. परीक्षा केंद्रात गैरप्रकार आढळल्यास तत्परतेने कायदेशीर कार्यवाई करावी, असे स्पष्ट निर्देश जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण यांनी दिली.

कॉपीमुक्त अभियानासाठी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आलेल्या जिल्हास्तरीय दक्षता समितीची बैठक आज जिल्हाधिकारी कार्यालयात पार पडली. त्यावेळी जिल्हाधिकारी बोलत होते. बैठकीस जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नतीशा माथुर, शिक्षणाधिकारी (माध्यमिक) सविता बिरगे यांच्यासह पोलीस विभागाचे अधिकारी व सर्व गटशिक्षण अधिकारी उपस्थित होते.

परभणी जिल्हयात बारावीचे एकूण ६९ परिक्षा केंद्र असून २७ हजार २५० विद्यार्थी संख्या आहे. तर दहावीचे ९१ परिक्षा केंद्र असून विद्यार्थी संख्या २९ हजार ९११ आहे.

परिक्षेसाठी सर्व विद्यार्थ्यांना शुभेच्छा देऊन जिल्हाधिकारी म्हणाले की, यंदा दहावी, बारावीची परिक्षा संपूर्णपणे कॉपीमुक्त होण्यासाठी राज्यशासनाने विशेष खबरदारी घेतली आहे.

गैरप्रकार होऊ नये यासाठी जिल्हयातील सर्व परिक्षा केंद्रांतील वर्ग खोल्यांमध्ये सीसी टिव्ही कॅमेरे लावणे आवश्यक आहे. गटशिक्षणाधिकाऱ्यांनी संबंधित केंद्रप्रमुखांना सीसी टिव्ही कॅमेरे लावण्याबाबत लेखी पत्राव्दारे कळवावे. ज्या परिक्षा केंद्रांवर सीसी टिव्ही कॅमेरे लावले नसल्याचे आढळल्यास याची गांभीर्याने दखल घेऊनअशा ठिकाणी शिक्षकांची अदलाबदल करण्यात यावी. तसेच त्या केंद्राची मान्यता रद्द करण्यातबाबत, शासनाला कळविले जाईल.

परिक्षा काळात वीज लोडशेडींग असल्यास पर्यायी व्यवस्था म्हणून बॅटरी किंवा इन्व्हर्टरची व्यवस्था करण्यात यावी. तसेच संवेदनशील केंद्रांच्या परिसरात गैरप्रकार टाळण्यासाठी व्हिडीओ शुटींगची सुविधा ठेवावी. भरारी पथक व बैठे पथकांनी विशेष दक्षता घ्यावी. अनुचित प्रकार आढळल्यास तात्काळ कार्यवाई करावी.

अतिसंवेदन व संवेदनशील परिक्षा केंद्र परिसरात पुरेसा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात यावा. वर्गखोल्यांमध्ये एका बाकावर एकच परिक्षार्थी असावा. महत्त्वाच्या पेपरच्या दिवशी मोठ्या प्रमाणात कॉपीचे प्रकार होणार नाहीत, याबाबत दक्षता घेण्यात यावी, अशा सूचना जिल्हाधिकारी यांनी दिल्या.



परिक्षा केंद्रांच्या परिसरात फौजदारी प्रक्रीया संहिता १९७३ चे कलम १४४ अन्वये प्रतिबंधात्मक आदेश जारी करण्यात येणार आहेत. या कलमान्वये परिक्षा केंद्राजवळच्या १०० मीटर परिसरातील सर्व सार्वजनिक टेलीफोन/ एसटीडी/भ्रमणध्वनी/ आयएसडी/फॅक्स केंद्र, झेरॉक्स केंद्र व ध्वनीक्षेपके बंद राहतील. हा आदेश परिक्षार्थी, परिक्षेशी संबंधित अधिकारी, शिक्षक, कर्मचारी तसेच पोलीस अधिकारी व कर्मचारी यांना लागू राहणार नाही. आदेशाचे उल्लंघन केल्यास संबंधितांवर कायदेशीर कार्यवाई केली जाईल.

एखादा परिक्षार्थी विद्यार्थी कॉपी किंवा गैरवर्तन करताना आढळल्यास त्याच्या विरोधात पोलीसात गुन्हा दाखल होऊ शकतो किंवा विद्यार्थी ज्या विषयात कॉपी करताना पकडला त्या विषयाचा निकाल रद्द केला जाऊ शकतो. गरज भासल्यास संपूर्ण परिक्षेचा निकाल रद्द केला जाऊ शकतो.

# कंधार पोलीसांची मोठी कामगिरी: २.८० लाखांचा मुद्देमाल जप्त, दोन आरोपींना अटक

**आत्ताच एक्सप्रेस**

**कंधार** – नांदेड पोलीस अधीक्षक कार्यालयाच्या वतीने दिलेल्या माहितीनुसार, कंधार पोलिसांनी चोरीच्या गुन्ह्यातील आरोपींना अटक करून मोठा मुद्देमाल हस्तगत केला आहे . मा. श्री. अविनाश कुमार, पोलीस अधीक्षक, नांदेड यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली . दिनांक २८ जानेवारी २०२६ ते २९ जानेवारी २०२६ च्या दरम्यान मौजे आनंदवाडी घोडज ते बोरी जाणारे रोडवर चोरी झाली होती . याप्रकरणी कंधार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता . गुन्ह्याचा तपास





करत असताना बातमीदाराकडून गोपनीय माहिती मिळाली की, चोरीस गेलेले ट्रॅक्टरची ट्रॉली व सेंट्रींगचे साहित्य हळदव शिवार ता. लोहा येथे आहे . या माहितीच्या आधारे पोलिसांनी छापा टाकून गोविंद व्यंकटी चोंडे आणि ओमकार बालकिसन चोंडे (दोघे रा. घोडज, ता. कंधार) या आरोपींना ताब्यात घेतले. चौकशीदरम्यान आरोपींनी गुन्ह्याची कबुली दिल्यानंतर त्यांच्याकडून एकूण २,८०,०००/-रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला, ज्यात ट्रॅक्टरची ट्रॉली, सेंट्रींग प्लेट्स आणि टँकरचा समावेश आहे .

या कामगिरीबद्दल मा. पोलीस अधीक्षक, नांदेड यांनी संबंधित पोलीस अधिकारी व अंमलदार यांचे कौतुक केले आहे.

# दलित वस्त्यांच्या बोगस कामांची न. पा. प्रशानाकडूनच पाठराखण

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुदखेड** – मुदखेड नगरपरिषद अंतर्गत शहरात सध्या विविध विकास कामे चालू आहेत परंतु विकास कामांच्या नावाखाली मोठा भ्रष्टाचार केला जात आहे. दलित वस्ती सुधार योजना व इतर विविध विकास कामामध्ये मोठ्या प्रमाणात आर्थिक घोटाळा व भ्रष्टाचार केला जात आहे. मुदखेड शहरातील रस्त्यांची बोगस आणि निकृष्ट कामे करणाऱ्या ठेकेदारांची चक्क नगर पालिका प्रशासनातील अधिकाऱ्यांकडून पाठराखण असल्याचे दिसत आहे. मागील काही कामांमध्ये ठेकेदारांवर व तत्कालीन मुख्याधिकारी तसेच अभियंत्यावर अनेक भ्रष्टाचाराचे गंभीर आरोप झाले होते. संबंधित अभियंते व गुत्तेदारांविरोधात कारवाईची मागणी केली होती, परंतु प्रशासनाकडून कोणतीही कार्यवाही झालेली नसल्याने मुदखेड शहरातील जनतेचा नगरपरिषद प्रशासनावर विश्वास राहिलेला नाही.



आता सध्या प्रभाग क्र. ०४ मधील अशोकनगर आणि चिखलवाडी या भागात लाखो रुपयांची कामे सुरू असून ही कामे अत्यंत बोगस आणि निकृष्ट दर्जाची होत आहेत. कामाची कुठलीही माहिती कामाच्या ठिकाणी लावलेली नसून नागरिकांना अंधारात ठेवून बेकायदेशीररित्या काम केले जात आहेत. यांच्याकडे प्रशासनाचा साफ कानाडोळा असल्याने शहरातील कामे कशी होतील दर्जेदार? असा प्रश्न उपस्थित होत आहे. गुत्तेदार शासकीय नियमानुसार म्हणजेच अंदाजपत्रकानुसार काम करत नसून स्टील, गिट्टी,रेती, सिमेंटचा कमी वापर करत आहेत यामध्ये शासनाच्या पैशाची लूट होत असून ''रस्ते व नाल्यांचे बेहाल'' गुत्तेदार मालामाल'' अशी परिस्थिती झाली आहे. याकडे संबंधित प्रशासनाने तातडीने लक्ष घालून शहरातील विकास कामे दर्जेदार करून घेण्याची गरज आहे असा संताजनक सवाल नागरिकांमधून होत आहे.

# महानिर्यात कार्यशाळेद्वारे सूक्ष्म व लघु उद्योजकांना मार्गदर्शन, उद्योग विभागाचा उपक्रम

**आत्ताच एक्सप्रेस**

**अकोला** – राज्याच्या आर्थिक विकासात महत्वपूर्ण योगदान देणा-या सूक्ष्म व लघु उद्योग क्षेत्रावर भर देऊन त्यांची कार्यक्षमता वाढविण्याचा उद्देश ठेवून जिल्हा उद्योग केंद्रातर्फे 'महानिर्यात इग्नाईट कार्यशाळा' आज हॉटेल आर. जी. एक्सक्लुसिव्ह येथे घेण्यात आली. अपर जिल्हाधिकारी प्रमोद गायकवाड यांच्या हस्ते कार्यशाळेचा शुभारंभ झाला. उद्योग सहसंचालक रंजना पोळ, जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक संतोष बनसोड, संकेत निनावे, श्री. रूनालिया, श्रद्धा टेकाम, आकाश ढगे, निर्यात तज्ज्ञ अंकित गुप्ता, अकोला औद्योगिक संघटनेचे अध्यक्ष मनोज खंडेलवाल आदी उपस्थित होते. राज्यात उद्योजकीय वातावरण अधिक व्यापक करून रोजगार, स्वयंरोजगार संधी मोठ्या प्रमाणात निर्माण करणे, एक जिल्हा एक उत्पादन उपक्रम राबविणे व निर्यातवृद्धीला चालना देणे हा कार्यशाळेचा उद्देश आहे. त्याचा स्थानिक उद्योजक बांधवांना निश्चित लाभ होईल. उद्योग विभागाच्या विविध योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन अपर जिल्हाधिकारी श्री. गायकवाड यांनी केले. भारताच्या जीडीपीत महाराष्ट्राचा वाटा १३ टक्के आहे. उद्योग विभागाकडून क्लस्टर डेव्हलपमेंट स्कीम, मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम अशा अनेक योजना राबविण्यात येत आहेत. जिल्ह्यात वस्त्रोद्योग, अन्नप्रक्रिया उद्योग उभे राहत असून, पातूर तालुक्यात टिकवूड उद्योग येथे आकारास येत आहे. ग्लोबल पॉलिसी सेंटर ही महत्वाकांक्षी योजनाही हाती घेण्यात आली असून, नव्या औद्योगिक धोरणानुसार सेवा क्षेत्र ही सबसिडीसाठी पात्र ठरवले आहे, असे महाव्यवस्थापक श्री. बनसोड यांनी प्रास्ताविकात सांगितले. जिल्हा उद्योग केंद्राचे व्यवस्थापक श्रीनिवास चव्हाण यांनी आभार मानले. कार्यशाळेला औद्योगिक संघटनांचे प्रतिनिधी, सूक्ष्म, लघु, मध्यम उद्योजक, निर्यातदार, नवउद्योजक, शेतकरी सहकारी संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

# सिंहस्थ कुंभमेळ्याचे परिपूर्ण दस्तऐवजीकरण करावे-केंद्रीय मंत्री गजेंद्रसिंह शेखावत

**आत्ताच एक्सप्रेस**

**नाशिक** – नाशिक त्र्यंबकेश्वर येथे पुढील वर्षी होणारा सिंहस्थ कुंभमेळा हा मोठा सांस्कृतिक ठेवा आहे. त्याचे परिपूर्ण दस्तऐवजीकरण करावे, असे निर्देश केंद्रीय सांस्कृतिक व पर्यटन मंत्री गजेंद्रसिंह शेखावत यांनी आज दिले.

केंद्रीय मंत्री श्री. शेखावत यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयातील मध्यवर्ती सभागृहात आज दुपारी नाशिक त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभमेळा २०२७ पायाभूत सुविधा व तयारी कामकाजाची आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर, विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम, नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा विकास प्राधिकरणाचे आयुक्त शेखर सिंह, जिल्हाधिकारी आयुष प्रसाद, महानगरपालिका आयुक्त मनीषा खत्री, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधीक्षक अभियंता अरुंधती शर्मा, कार्यकारी अभियंता नवनाथ सोनवणे, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचे प्रादेशिक व्यवस्थापक जगदीश चव्हाण, महाराष्ट्र राज्य पुरातत्व विभागाचे सहायक संचालक अमोल गोटे आदी उपस्थित होते.

केंद्रीय मंत्री श्री. शेखावत म्हणाले की, कुंभमेळ्याचे मोठे अध्यात्मिक महत्व आहे. त्याचे प्रतिबिंब रामकाल पथमध्ये उमटले पाहिजे. रामकाल पथ साकारताना स्थानिक वास्तू कलेशी सुसंगत रचना करावी. तसेच रंगसंगतीच्या माध्यमातून भाविकांना रामायण काळाची माहिती होईल, असे नियोजन करावे. त्यासाठी चित्रकला शाखेच्या स्थानिक विद्यार्थ्यांची मदत घ्यावी. कुंभमेळ्याचे नियोजन करताना महिला, तरुणांसह समाजातील विविध घटकांचा सहभाग घ्यावा. कुंभमेळ्यानिमित्त तैनात अधिकारी व कर्मचाऱ्यांची कार्यशाळा घ्यावी. त्यात त्यांना कुंभमेळ्याचे महत्व याविषयीची माहिती द्यावी.

कुंभमेळ्यानिमित्त देश- विदेशातून भाविक येतील. त्यांच्यासाठीच्या पायाभूत सोयीसुविधा वेळेत पूर्ण कराव्यात. या कालावधीत मोबाईल नेटवर्क सुरळीत राहण्यासाठी आतापासूनच उपाययोजना कराव्यात. रामकाल पथसह उर्वरित विविध विकास कामांसाठीचा प्रस्ताव राज्य शासनाच्या माध्यमातून तातडीने सादर करावा. तसेच त्र्यंबकेश्वर येथील विकास कामांचा समावेश असलेला परिपूर्ण आणि सर्वसमावेशक आराखडा सादर करावा. गर्दी व्यवस्थापनाचे सूक्ष्म नियोजन करावे. भाविकांच्या सोयीसाठी ठिकठिकाणी पाणी उपलब्ध होईल, असे नियोजन करावे. तसेच भाविकांसाठी हेल्पलाइन सुविधा कार्यान्वित करावी. नाशिकसह जिल्ह्यात धार्मिक, ऐतिहासिक पर्यटनाला मोठी संधी आहे. त्यादृष्टीने ब्रॅण्डिग करावे. नाशिक, त्र्यंबकेश्वर हवाई दळण- वळणाच्या सुविधा उपलब्ध होऊ शकतात का याची पडताळणी करावी, अशाही सूचना केंद्रीय मंत्री श्री. शेखावत यांनी केल्या.

विभागीय आयुक्त डॉ. गेडाम, कुंभमेळा आयुक्त श्री. सिंह, महानगरपालिका आयुक्त श्रीमती खत्री यांनी सिंहस्थ कुंभमेळ्यानिमित्त सुरू असलेली विकास कामे, साधूग्राम, त्र्यंबकेश्वर येथील दर्शन पथ, रामकाल पथ, भूसंपादन, बाधितांचे पुनर्वसन याविषयी सविस्तर माहिती दिली.

# हरित महाराष्ट्रसाठी ३०० कोटी वृक्ष लागवड मिशन राबवा-मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## हरित महाराष्ट्र प्राधिकरण स्थापनेसाठी प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश, वृक्ष लागवड मोहिमेत स्टार्टअपचा सहभाग घ्यावा

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई** – पर्यावरण संवर्धन, हवामान बदलाशी लढा आणि ग्रामीण रोजगार निर्मिती या त्रिसूत्रीवर महाराष्ट्रातील हरित क्षेत्र वाढविण्यासाठी २०२६ ते २०३१ या कालावधीत ३०० कोटी वृक्ष लागवडीचा कार्यक्रम हाती घ्यावा. वृक्ष लागवडीच्या कार्यक्रमात या क्षेत्रातील तज्ज्ञ, स्वयंसेवी संस्था याच्याबरोबरच स्टार्टअपचा सहभाग घ्यावा, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

प्रस्तावित हरित प्राधिकरण-३०० कोटी वृक्ष लागवड मिशन संदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली वर्षा निवास्थानी आढावा बैठक झाली. त्यावेळी मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले की, राज्यातील वनक्षेत्र ३३ टक्के करण्यासाठी मिशन मोडवर हा कार्यक्रम हाती घ्यावा. या कार्यक्रमाच्या समन्वयासाठी हरित महाराष्ट्र प्राधिकरण स्थापन करण्यासाठीचा प्रस्ताव मंत्रिमंडळ बैठकीत सादर करावा. शासकीय विभाग, विविध संस्थाबरोबरच या विषयातील स्टार्टअपचा सहभाग या मोहिमेसाठी घ्यावा. स्टार्टअपची इकोसिस्टीम तयार करून रोजगार निर्मिती करता येईल.



मराठवाड्यासारख्या कमी वृक्षाच्छादन असलेल्या भागात हा कार्यक्रम प्राधान्याने राबविण्यात यावा. हरित महाराष्ट्र उपक्रमांतर्गत रोप उपलब्धतेनुसार पहिल्या वर्षात सुमारे २० कोटीपर्यंत वृक्ष लागवड हाती घ्यावी. यामध्ये बांबू, साग लागवड करण्यात यावी. यासाठी लागणारी रोपे तयार करण्यासाठी शासकीय नर्सरी बरोबरच खासगी नर्सरी, बचतगट यांचाही सहभाग घ्यावा. या कार्यक्रमातील सर्व शासकीय विभागाबरोबरच वन विभाग, नर्सरी यांना उद्दिष्टे ठरवून द्यावीत, ग्रामीण भागात शेतकरी, युवा, महिलांचा सहभाग घ्यावा. असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

यावेळी 'मित्रा'चे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रवीण परदेशी यांनी या उपक्रमांचे सादरीकरण केले. या मिशन अंतर्गत राज्यातील विविध कृषी-हवामान पट्ट्यांनुसार स्थानिक परिसंस्थेला अनुरूप प्रजातींचीच लागवड करण्यात येणार असून, गवताळ प्रदेश व दलदलींमध्ये वृक्ष लागवड न करता त्यांचे पुनर्संचयितीकरण केले जाणार आहे. या मिशनची अंमलबजावणी डिजिटल व उपग्रह-आधारित रिअल-टाईम निरीक्षण प्रणालीद्वारे होणार असून, लागवड आणि वृक्ष जगण्याचा दर पारदर्शकपणे नोंदवला जाणार आहे. झाडे जिवंत असण्याचा दर, जंगलाची निर्मिती आणि रोपांच्या वाढीची नियमित तपासणी करण्यात येणार आहे. मनरेगा, कॅम्पा, कृषी विभाग व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या योजनांद्वारे तीन ते पाच वर्षांची निगा सुनिश्चित करण्यात आली आहे. तथापी वृक्ष जगण्यासाठी हा कालावधी १० वर्ष करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या उपक्रमातून भूजल पुनर्भरण, मातीची सुपीकता, जैवविविधता वाढीसोबतच ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणावर रोजगारनिर्मिती होणार आहे, असे यावेळी सांगण्यात आले.

यावेळी मुख्य सचिव राजेश अग्रवाल, मुख्यमंत्र्यांचे वरिष्ठ आर्थिक सल्लागार तथा मित्रा संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रविण परदेशी, जलसंपदा विभागाचे अपर मुख्य सचिव दीपक कपूर, वन विभागाचे अपर मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर, महसूल विभागाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे, नगरविकास (२) विभागाचे अपर मुख्य सचिव के. एच गोविंदराज, कृषी विभागाचे अपर मुख्य सचिव विकास चंद्र रस्तोगी, मृद व जलसंधारण सचिव गणेश पाटील, प्रधान मुख्य वन संरक्षक (वन बल प्रमुख) श्रीनिवास राव, प्रधान मुख्य वन संरक्षक (सामाजिक वनीकरण) विवेक खांडेकर, महाराष्ट्र रिमोट सेन्सिग अप्लिकेशन सेंटरचे (एमआरएसएसी) चे संचालक श्री. कोलते आदी उपस्थित होते.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक सुग्रीव सोपानराव मुंडे यांनी फाईन प्रिंट, १४०७०, खोकडपूरा, औरंगाबाद ४३१००१ (महाराष्ट्र), येथे छापून लक्ष्मी ऑफसेट, डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्या जवळ, रेल्वे स्टेशन रोड, परभणी जि.परभणी-४३१४०१ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. मुख्य कार्यालय ०२४०-२४७४८१३ * **संपादक - सुग्रीव सोपानराव मुंडे** मो.9421281078, RNI.No.MAH/MAR2014/56289

The Printer, Owner & Publisher Sugriv Sopanrao Munde Fine print,14070,khokadpura, Aurangabad-431001 (M.H.) Laximi offset,Near Dr.babasahen ambedkar,statue,station road, parbhani Dist. Parbhani-431401.(edition editor Laximikan mundhe) (cheif Editor - Sugriv Sopanrao Munde) Office Ph. : 0240-2474813